। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-28 । krushival.in
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

कृषीवल

रायगड | शुक्रवार । दि. ६ नोव्हेंबर २०२६ । अंक १५१ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

फळपीक विमा योजनेकडे

शेतकऱ्यांची पाठ

प्रमोद जाधव
। रायगड ।

फळपिकांच्या उत्पादनातील नुकसानीपासून संरक्षण देण्यासाठी कृषी विभागाने २ ऑक्टोबरपासून सुरू केलेल्या फळपीक विमा योजनेला शेतकऱ्यांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे. महिनाभराचा कालावधी उलटूनही जिल्ह्यातील केवळ ८४६ शेतकऱ्यांनी ४८९ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरविला आहे. त्यासाठी ४० लाख रुपयांचा विमा हप्ता भरण्यात आला आहे. नारळ-सुपारीसाठी १५ नोव्हेंबर, तर आंबा-काजूसाठी ३० नोव्हेंबर ही नोंदणीची अंतिम मुदत आहे. जिल्ह्यात फळपिकांचे मोठे क्षेत्र असताना नोंदणीचा वेग मंदावल्याने उर्वरित मुदतीत किमान ४० हजार शेतकऱ्यांपर्यंत विमा योजनेची माहिती पोहोचणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रायगड जिल्ह्यात भातपिकाबरोबरच फळपिकांच्या लागवडीवरही मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. आंबा, काजू, नारळ आणि सुपारीचे उत्पादन जिल्ह्यात घेतले जाते. भातशेतीला पर्यायी व्यवसाय म्हणून फळपिकांच्या लागवडीकडे पाहिले जात आहे. जिल्ह्यात आंब्याचे क्षेत्र १२ हजार ९५२ हेक्टर, काजूचे २ हजार ३९६ हेक्टर, नारळाचे ८६३.२० हेक्टर, तर सुपारीचे क्षेत्र १ हजार २४८ हेक्टर इतके आहे. दिवसेंदिवस फळपिकांचे क्षेत्र वाढत असून, तरुणांसह मध्यमवर्गीय शेतकरीही या लागवडीकडे वळत आहेत. यंदाही हवामानातील बदलांमुळे आंबा, काजू आणि इतर फळपिकांचे उत्पादक अडचणीत आले आहेत. कधी ऊन, तर कधी पाऊस अशा लहरी हवामानामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना सुरू करण्यात आली आहे. आंबा, काजू, नारळ आणि सुपारी या पिकांना नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण देण्यासाठी २ ऑक्टोबरपासून विमा नोंदणी सुरू करण्यात आली. काजू पिकासाठी प्रतिहेक्टरी ४ हजार ८०० रुपये विमा हप्ता असून, १ लाख २० हजार रुपयांचे विमा संरक्षण आहे. आंब्यासाठी प्रतिहेक्टरी ८ हजार ५०० रुपये हप्ता आणि १ लाख ७० हजार रुपयांचे विमा संरक्षण निश्चित करण्यात आले आहे. नारळासाठी प्रतिहेक्टरी ६ हजार ८०० रुपये विमा हप्ता, तर सुपारीसाठी ४ हजार रुपये हप्ता असून विमा संरक्षणाची रक्कम अनुक्रमे १ लाख ७० हजार आणि १ लाख रुपये आहे.

विमा नोंदणी सुरू होऊन एक महिना उलटला, तरी केवळ ८४६ शेतकऱ्यांनी ४८९ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरविला आहे. यासाठी ४० लाख रुपयांचा विमा हप्ता भरण्यात आल्याची माहिती कृषी विभागाने दिली. आंबा आणि काजू विमा नोंदणीसाठी आता केवळ २५ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे उर्वरित काळात नोंदणीला वेग येणार का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



- महिनाभरात केवळ ८४६ शेतकऱ्यांची नोंदणी
- ४८९ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरविला

कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

फळपीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी निर्धारित मुदतीत विमा नोंदणी करून घ्यावी. नैसर्गिक घटकांमुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळविण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

बदलत्या हवामानाचा फटका

फळपिकांच्या उत्पादनाला बसत असून उत्पादन घटण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. अशा परिस्थितीत विमा संरक्षणातून शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याचा कृषी विभागाचा प्रयत्न आहे. नारळ आणि सुपारी फळपीक विमा योजनेच्या नोंदणीची मुदत वाढविण्यात आली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना आता १५ नोव्हेंबरपर्यंत विमा नोंदणी करता येणार आहे. जिल्ह्यात नारळ आणि सुपारी या दोन्ही पिकांसाठी प्रत्येकी ११ महसूल मंडळे अधिसूचित करण्यात आली आहेत. यामध्ये अलिबाग तालुक्यातील अलिबाग, किहीम, सारळ, चौल आणि नागाव; मुरुडमधील मुरुड, नांदगाव आणि बोर्ली, तर श्रीवर्धनमधील बोर्ली पंचतन, वाळवटी आणि श्रीवर्धन या महसूल मंडळांच नारळ, सुपारी विमा नोंदणीच्या मुदतीत वाढ होणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.





निवडक



लॅपटॉप मूळ मालकाच्या स्वाधीन

पाली : सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथे सोमवारी (दि.२) रात्री पाली-खोपोली रस्त्यावर पोलीस पथक नेहमीप्रमाणे गस्त घालत होते. पेट्रोलिंगदरम्यान गोंदव फाटा येथे पोलिसांना रस्त्यालगत एक संशयास्पद बॉक्स पडलेला आढळला. त्यामुळे गस्तीवर असलेल्या पथकातील पोलिसांनी तात्काळ बॉक्सची पाहणी केली. तो उघडून पाहिला असता त्यात एसर कंपनीचे तब्बल ११ नवीन लॅपटॉप असल्याचे निष्पन्न झाले. त्या बॉक्समधील बिलावर असलेल्या संपर्क क्रमांकावर पोलिसांनी तात्काळ संपर्क साधून चौकशी केली. चौकशीदरम्यान हे पार्सल बॉक्स मुंबई-गोवा मार्गावर धावणाऱ्या नाईक ट्रॅव्हल्सच्या वाहनातून वाहतूक करत असताना नकळत रस्त्यावर पडल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी नाईक ट्रॅव्हल्सचे मालक मुराद अहमद नाईक आणि कूरियरचे मालक शिवाजी आनंदा साळुंखे यांच्याशी संपर्क साधून सखोल चौकशी करून पूर्ण खात्री पटवली. खातरजमा झाल्यानंतर पोलिसांनी साडेचार लाख रुपये किमतीचे सर्व ११ लॅपटॉप संबंधित कूरियर कंपनी व मालकांच्या स्वाधीन केले. आपला मौल्यवान ऐवज अवघ्या काही तासांत सुखरूप मिळाल्यामुळे कूरियर कंपनी आणि मालकाने रायगड पोलिसांचे आभार मानले.



(छायाचित्र: उदय कळस)

वृद्ध महिलेचा बंधाऱ्यासाठी उत्साह

म्हसळा : जलसंवर्धनाची जिद्द आणि श्रमदानाची तळमळ वयाच्या कोणत्याही टप्प्यावर कमी होत नाही, याचा प्रत्यय लेप येथे आला. गावापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या वनराई बंधाऱ्याच्या ठिकाणी जाण्यासाठी संपूर्ण डोंगरउतार उतरावा लागतो, तर परतताना तितकाच अवघड चढाव पार करावा लागतो. अशा अत्यंत दुर्गम आणि डोंगराळ परिस्थितीतही एका ८० वर्षीय वृद्ध महिलेने वनराई बंधारा बांधकामात उत्स्फूर्त सहभाग घेत सर्वांसमोर आदर्श निर्माण केला. वाढत्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्याचा उपक्रम हाती घेतला. यामध्ये वृद्ध महिलेचा उत्साह पाहून उपस्थितांनी विशेष कौतुक केले. त्यांच्या सहभागातून जलसंवर्धनाची खरी प्रेरणा मिळाली. यावेळी गटविकास अधिकारी मंगेश साळी, प्रशासन अधिकारी पंचायत समिती हेमंत माळी, उपसरपंच मधुकर लाड, गावाध्यक्ष नामदेव पवार, सचिव सुरेश लाड, शांताराम महाडिक, दीपक कांबळे, मारुती लाड, अशोक ठसाळ, सीताबाई रिकामे, जयश्री लाड, भागीबाई महाडिक, संगीता कांबळे व ग्रामस्थ उपस्थित होते.



खरोशी ग्रामस्थांचे पोलिसांना निवेदन

खरोशी : पेण तालुक्यातील खरोशी ग्रामपंचायत आणि गावपंच कमिटी ग्रामस्थ मंडळ यांनी पेण पोलीस निरीक्षक, तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात, दुरशेत या गावातील काही तरुणांकडून खरोशी गावाबाबत जाणीवपूर्वक बदनामीकारक वक्तव्ये केली जात आहेत. तसेच, खरोशी गावाची प्रतिमा मलिन होईल, अशा प्रकारे चुकीची माहिती व वक्तव्ये पसरवून दुरशेत ग्रामस्थांना चिथावणी देण्याचे कृत्य केले जात आहे. दुरशेत येथील काही तरूणांनी स्वयंभू केळंबादेवीचे नवरात्र उत्सवामध्ये बॅनर फाडले. तसेच, देवीच्या नवरात्र उत्सवामध्ये येणाऱ्या भाविकांचा अपघात होऊन खरोशी गावाची बदनामी कशी होईल, या हेतूने खरोशी-दुरशेत या दोन गावांना जोडणाऱ्या लोखंडी पुलाच्या जाळ्या काढून फेकून दिल्या. तसेच, सोशल मीडियावर खरोशी गावाविषयी व केळंबा माऊलीविषयी अपशब्द वापरून बदनामी करणे. उत्सवामध्ये दर्शन घेण्यासाठी आलेल्या भाविकांनी आपल्या गाड्या दुरशेत गावात पार्क केल्यामुळे गाड्यांची हवा काढून गाड्यांचे नुकसान केले. मंजूर झालेला नवीन पूल बांधण्यास विरोध दर्शवून शासनाच्या विकासाकामात अडथळा निर्माण करून दोन्ही गावांतील ग्रामस्थांमध्ये गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या कृत्यांमुळे गावांमधील शांतता व सामाजिक सलोखा बिघडण्याची तसेच भविष्यात वादविवाद किंवा अनुचित घटना घडण्याची भीती निर्माण झाली आहे. असे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.



भांडी विक्रेते कोल्हापुरातून रायगडात दाखल

अलिबाग : कोल्हापुर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील दुर्गम भागातील लोकं भात कापणी झाल्यावर पोटापाण्यासाठी होलसेल भांडी मार्केटमधून भांडी खरेदी करून ती विक्रीसाठी वेगवेळ्या जिल्ह्यांत जात असतात. त्या ठिकाणी असलेला बाजार, यात्रा किंवा रहदारीच्या ठिकाणी ते दुकान मांडून भांड्यांची विक्री करतात. सध्या ही मंडळी रायगड जिल्ह्यातील अलिबाग शहरानजिक दुकान लावून विविध प्रकारच्या भाड्यांची विक्री करत आहेत. त्यातील काहीजण डोक्यावर भांड्यांचा भार घेऊन शहरासह ग्रामीण भागातील घराघरात जाऊन भाडी विकताना दिसत आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आपल्या घरातही दिवाळी साजरी व्हावी, यासाठीची त्यांची तळमळ भांडी विकताना दिसत आहे. त्यामुळे त्यांच्याकडून भांडी विकत घेऊन त्यांचीही दिवाळी गोड करण्याचे आवाहन काही खरेदीदारांकडून करण्यात येत आहे.

उरणमध्ये अन्न सुरक्षा नियमांची पायमल्ली

■ अन्न, औषध प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष; स्थानिकांमधून संतापाची लाट

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहरासह तालुक्यात अन्न सुरक्षा नियमांची पायमल्ली करून खाद्यपदार्थ विक्रीचा बाजार बिनधास्त सुरू आहे. कुणाकडे परवाना नाही, कुणाला स्वच्छतेचे सोयरसुतक नाही, तर कुणाचे खाद्यपदार्थांचे किचन थेट नाल्यांच्या आणि ड्रेनेज टाक्यांच्या आसपास असल्याच्या तक्रारी आहेत. तरीही अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष जात नाही. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाची कृपादृष्टी उरणवर कधी होणार, असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित होत आहे.

उरणमध्ये हॉटेल, मिठाई दुकाने, चायनीज सेंटर, बेकरी, दुग्धजन्य पदार्थ विक्रेते, बिर्याणी सेंटर, वडापाव, भजीपाव, मिसळ, ढाबे, फळविक्रेते, पाणी विक्रेते, पाणीपुरी, भेळपुरी अशा विविध खाद्यव्यवसायांचा सुळसुळाट झाला आहे. यातील अनेक व्यावसायिक



आवश्यक परवानग्या आणि नोंदणीशिवाय व्यवसाय करीत असल्याच्या तक्रारी आहेत. भर रस्त्यावर खाद्यपदार्थ मांडायचे, उघड्यावर पदार्थ ठेवायचे आणि नागरिकांच्या ताटात काय वाढले जात आहे याची कोणतीही खातरजमा न करता व्यवसाय सुरू ठेवायचा, असा प्रकार सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे जनतेच्या आरोग्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर काही दिवस उरणमधील विक्रेत्यांच्या पायाखालची वाळू सरकली होती. त्यांच्याकडून दरपत्रके लावली गेली, कामगारांच्या डोक्यावर टोप्या चढवल्या, स्वच्छतेचे नियम पाळण्याची लगबग सुरू केली. मात्र, हा उत्साह काही दिवसांचाच ठरला. त्यानंतर पुन्हा उघड्यावरचे खाद्यपदार्थ, अस्वच्छ परिसर आणि नियमांना केराची टोपली दाखविण्यात आली.

तसेच, अधिकृत परवानग्या असलेल्या काही व्यावसायिकांच्या जागांबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. काही ठिकाणी दलदलीच्या परिसरात खाद्यपदार्थांची विक्री सुरू असल्याचे दिसते, तर काही हॉटेल आणि बारच्या किचनबाबत ड्रेनेज टाक्यांच्या जवळ स्वयंपाकघर असल्याच्या तक्रारी आहेत. अशा ठिकाणी तयार होणारे पदार्थ नागरिकांच्या पोटात जात असतील, तर आरोग्याच्या सुरक्षेची हमी कोण देणार, असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे. या सर्व प्रकारांबाबत वारंवार आवाज उठविण्यात आला. लेखी तक्रारीही करण्यात आल्या. परंतु, अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून कोणत्याही कारवाईचा बडगाही उगारला गेला नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

कागदी आश्वासने नकोत

आयुक्त तुकाराम मुंढे यांनी उरण तालुक्यात विशेष तपासणी पथक पाठवून हॉटेल, बार, मिठाई दुकाने, बेकरी, खाद्यपदार्थ विक्रेते आणि पाणी विक्रेत्यांची झाडाझडती घ्यावी. परवान्यांची तपासणी करावी, किचनमधील स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता, अन्न साठवणूक आणि कामगारांच्या आरोग्यविषयक नियमांची पडताळणी करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून आवश्यकतेनुसार परवाने निलंबित करावेत. त्यामुळे आता कागदी आश्वासने नकोत, प्रत्यक्ष धडक कारवाई हवी, अशी मागणी उरणकरांमधून बोलले जात आहे.

पनवेलमध्ये तीन ठिकाणी कारवाई

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातील सार्वजनिक ठिकाणी गॅस सिलिंडरचा वापर करून मानवी जीवितास धोका निर्माण होईल, अशा पद्धतीने खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या तीन विक्रेत्यांविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. गुरुवारी (दि.५) पहाटेच्या सुमारास करण्यात आलेल्या या कारवाईत दोन अंडाभुर्जी विक्रेते आणि एका मिसळपाव विक्रेत्याचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाई पहाटे दीड वाजण्याल्यापासून पनवेल रेल्वे स्थानकासमोर करण्यात आल्या. पहिल्या कारवाईत यावेळी शमीम अहमद कासार हा गॅस सिलिंडरच्या साहाय्याने शेगडी पेटवून अंडाभुर्जी विक्रीचा व्यवसाय करताना आढळून आला. दुसऱ्या कारवाईत पनवेल रेल्वे स्थानकासमोरच सुबोध तुळशीदास पुराडकर हा देखील गॅस सिलिंडरचा वापर करून अंडाभुर्जी विक्री करताना आढळला. तर, तिसऱ्या कारवाईत पनवेल बसस्थानक परिसरातील हॉटेल विसावा समोर महेंद्र शंकर जोशी हा गॅस सिलिंडरच्या साहाय्याने शेगडी पेटवून मिसळपाव विक्री करताना पोलिसांना आढळून आला. या तिन्ही प्रकरणांत गॅस सिलिंडरचा वापर करून सार्वजनिक ठिकाणी धोकादायक पद्धतीने खाद्यपदार्थ तयार केले जात असल्याने मानवी जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, या कारणास्तव पोलिसांनी त्यांच्यांवर गुन्हे दाखल केले आहेत.

दुरशेत ग्रामस्थांचे धरणे आंदोलन

। पेण । प्रतिनिधी ।

दुरशेत गावातील प्रलंबित पाच मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी पेण येथील प्रांत अधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी धरणे आंदोलन केले. ग्रामपंचायत अधिकारी सुनिता गांगुर्डे यांच्या कथित चुकीच्या कार्यपद्धतीमुळे पुलाच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. विशेष म्हणजे, आंदोलनातील पाच प्रमुख मागण्यांपैकी तीन मागण्या थेट ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामकाजाशी संबंधित आहेत.



दुरशेत येथील पुलाच्या बांधकामाला ग्रामस्थांनी ग्रामसभेत ठराव करून विरोध दर्शविला होता. मात्र, हा ठराव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे पुलाच्या बांधकामासाठी सुमारे ११ कोटी रुपयांच्या आसपास निधी मंजूर होऊन कार्यारंभ आदेशही निघाले. ग्रामसभेचा विरोध दर्शविणारा ठराव वेळेत वरिष्ठ स्तरावर पाठविला असता, तर आज निर्माण झालेली परिस्थिती टाळता आली असती, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, २०२० मध्ये ग्रामपंचायतीकडून या पुलाची दुरुस्ती अथवा नवीन पूल बांधण्याबाबत तत्कालीन आमदारांकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, त्यानंतर ग्राम स्थांनी एकत्र येत ग्रामसभेत हा पूल बांधण्यात येऊ नये, असा ठराव मंजूर केला. परंतु, हा ठराव वरिष्ठ कार्यालयापर्यंत न पोहोचल्याने पुढील कार्यवाहीत संभ्रम निर्माण झाला. आता पुलासाठी निधी मंजूर होऊन कार्यारंभ आदेश निघाल्याने या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी म ागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, खरोशी गावाच्या बाजूने नदीपात्रात टाकण्यात आलेल्या भरावामुळे दुरशेत गावाला पुराचा धोका निर्माण झाल्याचा मुद्दाही आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. आंदोलनादरम्यान उदय गावंड यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत ग्राम स्थांची भूमिका मांडली.

झाडाझुडुपे वाहनचालकांची डोकेदुखी

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड-सुपेगांव रस्त्यावर असलेला झाडाझुडुपांचा विळखा वाहनचालकांची डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवासीवर्गातून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

मुरुडवरून रोह्याकडे जाण्यासाठीचा जवळचा मार्ग असलेल्या मुरुड-सुपेगांव रस्ता अरूंद असून, रस्त्यालगत अनेक ठिकाणी झाडाझुडपांचा विळखा आहे. विशेष करून वळणावरील झाडाझुडपांमुळे समोरून येणारे वाहन दिसत नाही. त्यामुळे या मार्गावरून



वाहन चालवताना ही झाडेझुडपे चालकांना मोठी डोकेदुखी ठरत आहे. कोकणात भरपूर प्रमाणात पाऊस पडत असून याठिकाणी गवत, झाडीझुडपे मोठ्या प्रमाणावर वाढतात. त्यामुळे रस्त्यावरून वाहनचालकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागते. अपघातानंतरच संबंधित बांधकाम खात्याला जाग येणार का? तसेच, संबंधित बांधकाम विभाग यात लक्ष पुरवून सुपेगांव रस्त्यालगत असलेला झाडाझुडपांचा विळखा हटविण्यात व रस्ता रुंदीकरण करण्यात योग्य ती उपाययोजना करतील का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

भरधाव कारची दुचाकीला धडक

पनवेल : नवीन पनवेल येथील विनय सुर्वाडे (५८) हे आपल्या पत्नीसह दुचाकीवरून प्रवास करत होते. यावेळी नवीन पनवेल पुलाजवळील चौकामध्ये पांढऱ्या रंगाच्या कारचालकाने त्यांच्या दुचाकीला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील प्रिया सुर्वाडे (४४) यांच्या पायाला किरकोळ दुखापत झाली. मात्र, अपघात घडल्यानंतर कारचालकाने जखमी महिलेला कोणतीही वैद्यकीय मदत न करता तो घटनास्थळावरून पळून गेला.

दिवाळी फराळाचे अर्थकारण कोलमडले

। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर घरगुती फराळ तयार करण्याची लगबग सुरू झाली असतानाच वाढत्या महागाईने महिला गृहउद्योजिकांच्या व्यवसायाचे आर्थिक गणित विस्कटले आहे. चकली, करंजी, लाडू, चिवडा, शेव आणि शंकरपाळी अशा पारंपरिक फराळाच्या पदार्थांना मागणी असली, तरी खाद्यतेल, डाळी, साखर आणि इतर कच्च्या मालाच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यात व्यावसायिक गॅस सिलिंडर, पॅकिंग साहित्य आणि मजुरीच्या खर्चाची भर पडल्याने पनवेलमधील महिला गृहउद्योजिकांसमोर व्यवसाय टिकवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. दिवाळीच्या हंगामात घरगुती फराळ तयार करून विक्री करणे हा अनेक महिलांसाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत असतो. घरच्या घरी मर्यादित साधनसामग्रीच्या आधारे सुरू केलेल्या या व्यवसायातून अनेक महिला आर्थिक स्वावलंबन मिळवतात. मात्र, यंदा कच्च्या मालाच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे त्यांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे.

७२.९८ लाखांची फसवणूक

। पनवेल । प्रतिनिधी ।

एका ३२ वर्षीय महिलेने पनवेल शहरातील ओरियन मॉल येथे पहिल्या गुंतवणूकदाराची भेट घेतली होती. यावेळी महिन्याभरात गुंतवलेली रक्कम दुप्पट करून देण्याचे तसेच मूळ रक्कम सुरक्षित राहील, असे आश्वासन तिने दिले. या आमिषाला बळी पडून उरण तालुक्यातील कोंढरीपाडा येथील ३१ वर्षीय व्यक्तीने ८ सप्टेंबर रोजी ४ लाख रुपये, तर ९ सप्टेंबर रोजी आणखी ९८ हजार रुपये गुंतवले. त्यानंतर अन्य तीन व्यक्तींनीही या योजनेत लाखो रुपयांची गुंतवणूक केली. अशा प्रकारे चार जणांकडून एकूण ७२ लाख ९८ हजार रुपये स्वीकारण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. गुंतवणुकीनंतर महिनाभराचा कालावधी उलटूनही ठरल्याप्रमाणे दुप्पट रक्कम मिळाली नाही. त्यामुळे गुंतवणूकदारांनी मूळ रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. मात्र, मात्र आपली आर्थिक फसवणूक झाल्याचा संशय गुंतवणूकदारांना आल्याने त्यांनी पनवेल शहर पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदवली.

तरुण बेपत्ता

पनवेल : अबुधाबीहून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झालेला बदलापूर येथील ३४ वर्षीय सुशांत तांबे हा तरुण अचानक बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. विमानतळावर उतरल्यानंतर तो घरी न परतल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली आहे. याप्रकरणी तरुणाच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून विमानतळ पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. सुशांत तांबे असे बेपत्ता झालेल्या तरूणाचे नाव असून, तो नोकरीनिमित्त अबुधाबी येथे वास्तव्यास होता.

महिला विंगचा सिडकोला अल्टिमेटम

। पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा फेज १, २ आणि खारघर परिसरातील गंभीर पाणीटंचाईच्या प्रश्नावर ऑल इंडिया उलमा बोर्डच्या महिला विंगने सिडको प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रश्नावर नागरिकांना दिलासा मिळावा, या मागणीसाठी महिला विंगच्या पदाधिकाऱ्यांनी रायगड भवन येथे सिडकोच्या जलविभागातील अधिकाऱ्यांची भेट घेऊन पाणीपुरवठ्याच्या अनियमिततेचा जाब विचारला. यावेळी सात



दिवसांचा अल्टिमेटम देत पाणीपुरवठ्यात तातडीने सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. या बैठकीला सिडकोचे अधीक्षक अभियंता नानिक चोतानी आणि सहाय्यक कार्यकारी अभियंता चेतन बुध उपस्थित होते. तळोजा आणि खारघर परिसरात नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा, कमी दाबाने पाणी येणे आणि अनियमित वेळापत्रक अशा समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे महिला विंगच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

रातवड विद्यालयात दीपोत्सवाचा उत्साह | **सांस्कृतिक कार्यक्रमांनी उजळला परिसर**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

। माणगाव । प्रतिनिधी ।

रातवड येथील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिरात बुधवारी (दि.४) सायंकाळी दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचा परिसर विद्युत रोषणाई, आकर्षक किल्ले प्रदर्शन, दिवाळी गीतांचे सूर, विद्यार्थ्यांची नृत्ये, फटाक्यांची आतषबाजी आणि दिवाळी फराळाची मेजवानी अशा विविध उपक्रमांनी प्रकाशमय झाला होता.

सेवा इंटरनॅशनलचे सल्लागार प्रसाद शिरशिकर, किशोरी विकास प्रकल्पाच्या माणगाव विभाग प्रमुख निशा भादावकर, सामाजिक कार्यकर्त्या देवका मोरे, अमोल जाधव आणि



मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार दिवाळी गीतांनी आणि नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी साकारलेली आकर्षक किल्ल्यांची प्रतिकृती हे दीपोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. तसेच, सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी तयार केलेले उटणे आणि पणत्या यांच्या निर्मितीमध्ये विशेष कौशल्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते कौतुक करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कल्पकतेला आणि व्यावहारिक कौशल्यांना प्रोत्साहन मिळाले.

उडान टीमच्या विशेष सहकार्यातून विद्यार्थी व पालकांना दिवाळीचा फराळ वितरित करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते सागर भगत यांनी विद्यार्थ्यांसाठी प्रदूषणमुक्त फटाक्यांची व्यवस्था करून दीपोत्सवाचा आनंद द्विगुणित केला. फटाक्यांची आतषबाजी आणि आकर्षक विद्युत रोषणाईमुळे उत्सवाला विशेष रंगत आली. विद्यालयात प्रथमच सायंकाळच्या सत्रात आयोजित करण्यात आलेल्या या दीपोत्सवाला पालक, आजी-माजी विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विद्यार्थ्यांसोबत पालकांनीही उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यामुळे शालेय परिसरात आनंद, उत्साह आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे आणि शालेय समिती अध्यक्ष सुनील पाटील यांनी मार्गदर्शन करून विशेष कौतुक केले. हा दीपोत्सव शिक्षणासोबत संस्कार, सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालणारा विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

धनत्रयोदशी

रायगड | शुक्रवार | दि. ६ नोव्हेंबर २०२६ | अंक १५१ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

दीडशे हेक्टर वनजमिनीवर

अतिक्रमणाचा विळखा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगडमधील वनसंपत्तीवर अतिक्रमण करणाऱ्यांचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत असून, अलिबाग उपवन संरक्षक विभागाच्या अखत्यारितील तब्बल १५४ हेक्टर वनजमीन अतिक्रमणाच्या घशात गेली आहे. पनवेल आणि अलिबाग वनक्षेत्रात सर्वाधिक अतिक्रमण झाले असून, तब्बल ३ हजार ३४ जणांनी वनजमिनीवर कब्जा केल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. कुणी घरे बांधली, कुणी शेती-बागायती सुरू केली, तर कुणी फार्महाऊस उभारले आहेत. भूमाफियांकडून शेड, कुंपण, उत्खनन असे प्रकारही सुरू आहेत. वनसंवर्धनाच्या प्रयत्नांना अतिक्रमणामुळे खीळ बसत असून, वन्यप्राण्यांचा नैसर्गिक अधिवासही धोक्यात आला आहे.

- ३ हजार ३४ जणांचा वनजमिनीवर कब्जा
- जंगलाचे अस्तित्व धोक्यात, वन्यप्राण्यांच्या अधिवासावरही घाला

> वनक्षेत्रातील अतिक्रमण हटविण्यासाठी कारवाई करण्यात आली आहे. नागरिकांनी वनजमिनीवर अतिक्रमण करू नये. अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल.
> – उमेश बावरे, उपवन संरक्षक

तीन महिन्यांत नव्याने १२ अतिक्रमणे

जुनी अतिक्रमणे हटविण्याचे आव्हान कायम असतानाच नव्यानेही वनजमिनी बळकावण्याचे प्रकार सुरूच आहेत. जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांच्या कालावधीत १२ जणांनी नव्याने ०.३३ हेक्टर वनक्षेत्रावर अतिक्रमण केल्याची माहिती वन विभागाने दिली आहे. यापूर्वीच्या अतिक्रमणांवरून नागरिक आणि वन विभागात वारंवार वाद निर्माण झाले आहेत. कारवाईनंतरही नव्याने अतिक्रमणे होत असल्याने वन विभागाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अपुऱ्या मनुष्यबळामुळे कारवाईला खीळ

रायगडमधील वनजमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी वन विभागाकडून कारवाई केली जात असली तरी अपुऱ्या मनुष्यबळामुळे मोहिमेला मर्यादा येत असल्याचे विभागातील काही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. पुरेसे कर्मचारी नसल्याने अतिक्रमण रोखणे आणि प्रत्यक्ष कारवाई करणे कठीण जात आहे. त्यामुळे नव्याने रुजू झालेले उपवन संरक्षक उमेश बावरे वनजमिनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी मनुष्यबळ वाढविणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रायगडच्या अलिबाग उपवन संरक्षक विभागाच्या कार्यक्षेत्रात अलिबाग, पेण, सुधागड, कर्जत, खालापूर, पनवेल आणि उरण या तालुक्यांचा समावेश आहे. पनवेल उपविभागात कर्जत पूर्व, कर्जत पश्चिम, खालापूर, पनवेल, उरण आणि माथेरान, तर अलिबाग उपविभागात अलिबाग, पेण, वडखळ, नागोठणे आणि सुधागड अशी ११ वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालये कार्यरत आहेत. या विभागाच्या कार्यक्षेत्रात पूर्वी १ हजार ७९ हेक्टर वनक्षेत्र होते. मात्र, आता ते घटून १ हजार ४५.६३ हेक्टरवर आले आहे. त्यापैकी तब्बल १५४ हेक्टर ●➤पान ५ वर

अन्यायाविरुद्ध शेकाप रस्त्यावर उतरणार!



| मुंबई | प्रतिनिधी |

शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा, सर्वसामान्यांच्या खिशावर वीजबिलांचा भार आणि सह्याद्रीच्या पर्यावरणाची हानी करणारे प्रकल्प, अशा विविध मुद्द्यांवर शेतकरी कामगार पक्षाने सरकारला थेट आव्हान दिले आहे. अन्यायाविरुद्ध शेतकरी कामगार पक्ष रस्त्यावर उतरून संघर्ष करेल, असा ठाम इशारा पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला. गोकुळ दूध संघातील शासकीय व तज्ज्ञ स्वीकृत सदस्य नियुक्ती, जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविणे आणि टोरेंट प्रकल्पाच्या मुद्द्यांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. दरम्यान, दुष्काळग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी शेकाप क्राऊड फंडिंगच्या माध्यमातून निधी उभारणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंबईत गुरुवारी (दि. ५) पत्रकारांशी बोलताना त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवरही जोरदार हल्लाबोल केला. यावेळी शेकापचे मुंबई कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या प्रमुख ॲड. साम्या कोरडे आदी उपस्थित होते.

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये शेकापचे कार्यकर्ते व पदाधिकारी आजही सक्रिय आहेत. कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघातही शेकापचे पदाधिकारी संचालक म्हणून निवडून आले आहेत. मात्र, शेतकऱ्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा अधिकार डावलून सरकार शासकीय व तज्ज्ञ स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याच्या तयारीत आहे. हा शेतकऱ्यांच्या लोकशाही अधिकारांवर घाला असल्याचे सांगत, या निर्णयाविरोधात शेकाप रस्त्यावर उतरून लढा देईल, असा इशारा चित्रलेखा पाटील यांनी दिला.

- चित्रलेखा पाटील यांचा सरकारला निर्वाणीचा इशारा
- गोकुळ, स्मार्ट मीटर, वृक्षतोडीविरोधात आंदोलनाचा निर्धार

दुसरीकडे, वाढत्या वीज बिलांमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले असताना, अदानी पॉवरचे कर्मचारी जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवत आहेत. या प्रकारावर सरकारने मौन बाळगल्याची टीका करत, जनतेवर लादले जाणारे स्मार्ट मीटर शेकाप खपवून घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

टोरेंट प्रकल्पासाठी होत असलेल्या वृक्षतोडीवरूनही त्यांनी सरकारला लक्ष्य केले. सह्याद्रीच्या डोंगरकपारी आणि पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या प्रकल्पाला अवघ्या २० दिवसांत परवानग्या देण्यात आल्या. हजारो झाडांची कत्तल सुरू असल्याचा आरोप करत, विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी दिला जात असल्याचे त्यांनी म्हटले.

दरम्यान, सांगोला आणि कोल्हापूरमधील निवडणुकीतील यश हे पक्षाच्या विचारधारेच्या सामर्थ्याचा पुरावा आहे, असेही चित्रलेखा पाटील शेवटी बोलताना म्हणाल्या.

यावेळी शेकापच्या महिला पदाधिकारी साम्या कोरडे यांनी पोलिसांच्या माध्यमातून आंदोलकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप केला. आंदोलकांना पीस बाँडवर स्वाक्षरी करण्यास भाग पाडले जात आहे. मात्र, अशा दबावाला आम्ही झुकणार नाही आणि पीस बाँडवर स्वाक्षरी करणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. सध्याची परिस्थिती आणीबाणीसारखी असल्याची टीकाही त्यांनी केली.

दुष्काळग्रस्तांसाठी निधी उभारणार

दुष्काळाचा सामना करणाऱ्या शेतकरी आणि नागरिकांना मदत करण्यासाठी शेकाप पुढाकार घेणार आहे. त्यासाठी क्राऊड फंडिंगच्या माध्यमातून लोकसहभागातून जास्तीत जास्त निधी उभारण्यात येणार असल्याचे चित्रलेखा पाटील यांनी स्पष्ट केले.

वेधक

सख्ख्या भावाची गळा आवळून हत्या

पनवेल : आजारपणाला कंटाळून सख्ख्या भावानेच नायलॉनच्या रस्सीने गळा आवळून भावाची हत्या केल्याची धक्कादायक घटना खांदा कॉलनीत घडली. याप्रकरणी राहुल भगवान सणस (४५) याच्याविरोधात ५ नोव्हेंबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. रोहन भगवान सणस असे मृत भावाचे नाव आहे. राहुल सणस हा ओम वैभव सोसायटी, सेक्टर ७, खांदा कॉलनी येथे राहतो. त्याचा भाऊ रोहन हा गेल्या काही महिन्यांपासून आजारी होता. त्याच्या आजारपणाला कंटाळून राहुलने ४ ऑक्टोबर रोजी नायलॉनच्या रस्सीने रोहनचा गळा आवळून हत्या केली.

विवाहितेची आत्महत्या

नेरळ : पतीकडून होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून झुगरेवाडी येथील विवाहितेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात पतीविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी सायं. ५.३० वाजण्याच्या सुमारास कर्जत येथील झुगरेवाडी येथे घडली. पतीकडून होत असलेल्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून तिने राहत्या घरी विषारी औषध प्राशन केले. ही बाब लक्षात येताच सासऱ्यांनी तिला उपचारासाठी उल्हासनगर येथील सेंट्रल रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला.

गोकुळवर कब्जासाठी महायुतीचे षड्यंत्र

- सतेज पाटील यांचा घणाघात
- ९ नोव्हेंबरला कोल्हापुरात महामोर्चा

| मुंबई | प्रतिनिधी |

कोल्हापूरच्या शेतकऱ्यांनी निवडणुकीत दिलेला कौल डावलून गोकुळ दूध संघावर कब्जा करण्याचा महायुती सरकारचा डाव आहे. पाच सरकारी सदस्य नियुक्त करण्याचा निर्णय म्हणजे स्वाभिमानी कोल्हापूरकरांचा अपमान असून, सहकार क्षेत्राला काळिमा फासणारा प्रकार आहे, असा घणाघात काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी केला.



या निर्णयाविरोधात ९ नोव्हेंबरला कोल्हापुरातील दसरा चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

गुरुवारी गांधी भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सतेज पाटील यांनी सरकारच्या निर्णयावर जोरदार टीका केली. गोकुळमध्ये पाच सरकारी सदस्य नियुक्त करण्यासाठीच सरकारने स्वतंत्र कायदा आणला असून साखर कारखाने आणि जिल्हा बँकांना त्यातून वगळण्यात आले आहे. निवडणूक झाल्यानंतर कायदा करून तो पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे कितपत योग्य आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

आज गोकुळसाठी केलेला कायदा उद्या अन्य सहकारी संस्थांनाही लागू केला जाऊ शकतो. देशभरात अमूल आणि मदर डेअरी हेच दोन ब्रँड ठेवण्याचा भाजप सरकारचा डाव असल्याचा आरोपही त्यांनी केला.

गोकुळवर साडेपाच लाख शेतकऱ्यांचा संसार अवलंबून असून, दर दहा दिवसांनी शेतकऱ्यांना सुमारे १०० कोटी रुपये दूध बिलापोटी दिले जातात. दररोज २० लाख लीटर दूध संकलन करणारी ही संस्था शेतकऱ्यांच्या मालकीची आहे. मात्र, शेतकऱ्यांचा कौल डावलून सरकार सत्तेचा गैरवापर करीत असल्याचा आरोप पाटील यांनी केला. या कायद्यामागे मंत्री हसन मुश्रीफ आणि चंद्रकांत पाटील यांचा सहभाग असल्याचा दावाही त्यांनी केला.

महिलेचा विनयभंग

| नेरळ | प्रतिनिधी |

नदीवर कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिलेला एकटी पाहून तिचा विनयभंग केल्याची घटना कर्जत तालुक्यातील कोंदिवडे ग्रामपंचायत हद्दीतील उमरोली येथे घडली. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उमरोली येथील नदीवर संबंधित महिला कपडे धुण्यासाठी गेली होती. यावेळी कोंढाणे येथील आरोपीने तिच्या पाठीमागून येत कमरेला पकडून बाजूला ओढले. तसेच तिला निर्मनुष्य ठिकाणी नेण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने आरडाओरडा केला. त्यानंतर आरोपीने तिला बाजूला ढकलून घटनास्थळावरून पळ काढला. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नदीपात्रात अतिक्रमण, उत्खननाचा धुमाकूळ



● (छायाचित्र : गौसखान पठाण)

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

नदीपात्रात कथित अनधिकृत बांधकामे, उत्खनन आणि वॉल कंपाउंड उभारण्याचे प्रकार सुरू असताना महसूल आणि पाटबंधारे विभाग मात्र जबाबदारी झटकत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. नदीच्या नैसर्गिक प्रवाहाशी छेडछाड झाल्यास गावांवर पुराचे संकट ओढवण्याची भीती व्यक्त

- ग्रामस्थांचा प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम
- कारवाई न झाल्यास जनआंदोलनाचा इशारा

करत आरडेचीवाडी (हेदवळी), कानसळ आणि दहिगाव परिसरातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. संबंधित विभागांनी १५ दिवसांत ●➤पान ५ वर

दिवाळीच्या गर्दीत रस्त्याचे काम नको

- कुरुळ तलाव ते बेलकडेदरम्यानचे काँक्रिटीकरण थांबवा
- जिल्हाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करावा, नागरिकांचे साकडे

| अलिबाग | प्रतिनिधी |

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये पर्यटकांची वाढणारी गर्दी आणि आधीच वाहतूक कोंडीने त्रस्त असलेल्या नागरिकांचा विचार करता कुरुळ तलाव ते बेलकडे फाट्यादरम्यानचे काँक्रिटीकरण दिवाळीनंतरच करावे, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी केली आहे. गतवर्षीच्या वाहतूक कोंडीचा अनुभव पाठीशी असताना ●➤पान ५ वर



> रस्त्याचे काम भाऊबीज झाल्यानंतरच सुरू करावे. तोपर्यंत धूळ उडू नये म्हणून रस्त्यावर नियमित पाणी मारावे. कुरुळ ते बेलकडे दरम्यान नेहमीच मोठी वाहतूक कोंडी होते. गर्दीच्या दिवसांत काम बंद ठेवल्यास वाहतूक सुरळीत राहील आणि नागरिकांना दिलासा मिळेल. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याकडे तातडीने लक्ष द्यावे.
>
> – रुपेश पाटील, ग्रामस्थ, बेलकडे

एसटीच्या कर्मचाऱ्यांना १० हजारांची दिवाळी भेट

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी प्रत्येकी दहा हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२,५०० रुपये सण उचल आणि महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला.

एसटी महामंडळातील विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. महामंडळ आर्थिक अडचणींचा सामना करत असतानाही कर्मचाऱ्यांच्या दिवाळीचा आनंद हिरावून घेता येणार नाही, अशी ठाम भूमिका मंत्री सरनाईक यांनी यावेळी मांडली.

एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र मेहनत करून लाखो प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची सेवा देतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून दिवाळीच्या सणानिमित्त त्यांना सानुग्रह अनुदान देणे हे केवळ औदार्य नसून त्यांचा हक्क आहे. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हे आमचे कर्तव्य आहे, असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ●➤पान ५ वर

६५ आसनी 'जिजाऊ' बसेस लांब पल्ल्याच्या मार्गावर | **जुन्या गाड्यांच्या वारंवार बिघाडाने प्रवासी मात्र त्रस्त**

अलिबाग एसटीच्या ताफ्यात तीन नव्या बसेस

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग एसटी आगाराच्या ताफ्यात तीन नव्या गाड्यांची भर पडली असून, बुधवारी या गाड्या पनवेलसह अन्य लांब पल्ल्याच्या मार्गांवर धावू लागल्या. ६५ आसनक्षमता असलेल्या डिझेलवर चालणाऱ्या या 'जिजाऊ' बसेसमुळे प्रवाशांना दिलासा मिळणार असल्याचा विश्वास आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी व्यक्त केला. मात्र, नव्या गाड्यांचे स्वागत होत असतानाच जुन्या बसेसच्या सततच्या बिघाडामुळे प्रवाशांचे हाल सुरूच आहेत.

जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या अलिबाग एसटी आगारात सुमारे ८० बसेस असून, त्यामध्ये लालपरी, शिवशाही आणि सीएनजी बसेसचा समावेश आहे. आगारात सुमारे २५० अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून, त्यात दीडशेहून अधिक चालक व वाहक आहेत. अलिबाग आगारातून दररोज एक लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात. विविध मार्गांसह लांब पल्ल्याच्या गाड्या सोडल्या जातात. अलिबाग-पनवेल विनाथांबा सेवेलाही प्राधान्य दिले जात आहे. मात्र, जुन्या गाड्या वारंवार बंद पडत असल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. बुधवारी सकाळी महाजनेहून अलिबागला येणारी बस बेलकडे ते ढवरदरम्यान बंद पडल्याने प्रवाशांचे हाल झाले.



अलिबाग-कनकेश्वर बस दीड तास उशिराने

अलिबाग आगारातून सायंकाळी ५.३० वाजता नियमित सुटणारी अलिबाग-कनकेश्वर बस बुधवारी तब्बल दीड तास उशिराने सुटली. कामावरून घरी जाणारे कर्मचारी आणि कनकेश्वर परिसरात जाणाऱ्या प्रवाशांना याचा फटका बसला. बसची वाट पाहून वैतागलेल्या वृद्ध आणि महिला प्रवाशांनी सायंकाळी ६.३० च्या सुमारास संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली. मात्र, त्यांना समाधानकारक उत्तर देण्याऐवजी अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे प्रवाशांनी एसटी प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

एलईडी मासेमारीविरोधात कारवाई

३० एलईडी दिवे, जनरेटर आणि नौकेसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

बंदी असतानाही समुद्रात एलईडी दिव्यांच्या सहाय्याने मासेमारी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या नौकेवर रायगडच्या मत्स्य विभागाने धडक कारवाई केली. मांडवा बंदर परिसरात शनिवारी (दि. ३१) पहाटे साडेचारच्या सुमारास टाकलेल्या छाप्यात ३० एलईडी दिवे, जनरेटर आणि मासेमारीची नौका असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. महालक्ष्मी प्रसन्न असे या नौकेचे नाव असून, मुंबईतील वर्सोवा येथील केशव कोळी यांच्या मालकीची ती आहे.

मत्स्य विभागाचे पथक रात्रीच्या वेळी मांडवा परिसरातील समुद्रात गस्त घालत असताना अंधाराचा फायदा घेऊन एलईडी दिवे आणि जनरेटरच्या सहाय्याने मासेमारी सुरू असल्याचे निदर्शनास आले. सहाय्यक ●➤पान ५ वर



कठोर कारवाईचा इशारा

रायगड जिल्ह्याच्या सागरी हद्दीत अवैध मासेमारी, एलईडी दिव्यांचा वापर आणि मत्स्यसंपत्तीचे नुकसान करणाऱ्या प्रकारांवर मत्स्यव्यवसाय विभागाची नियमित गस्त सुरू आहे. अशा बेकायदेशीर कृत्यांत सहभागी नौकांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा विभागाने दिला आहे.

ट्रम्प 'बापा'चा सुपडा साफ

लोकशाही देशात दीर्घ काळ सत्तेत राहणारे दोन प्रकारचे नेते असतात. एक म्हणजे सर्वांना बरोबर घेऊन जाणारे, उदारमतवादी व लोकप्रिय नेते. दुसरे म्हणजे समाजात फूट पाडून एका समाजाला दुसऱ्याविरुध्द झुंजवणारे आणि त्यात आपला सत्तेचा स्वार्थ साधून घेणारे नेते. सध्या एका मोठ्या समुहाला कोणत्या तरी धर्मीय समाजाची भीती दाखवून आपल्या पदाचा खुंटा बळकट करणाऱ्या राक्षसी हुकुमशहांचे जगभर पेव फुटलेले आहे. इस्रायलचे नेतान्याहू, तुर्कस्तानचे एर्दोगान हे त्यापैकीच होत. अमेरिकेचे डोनाल्ड ट्रम्प हे या सगळ्यांचे बाप होते. अमेरिका हा सर्वात श्रीमंत आणि लष्करीदृष्ट्या सर्वात बलाढ्य देश आहे. शिवाय तेथील लोकशाहीचे बरेच कौतुक एरवी चालू असते. पण तिथल्या लोकांची मती भ्रष्ट झाली. सरळसरळ भ्रष्ट, स्त्रियांविषयी घाणेरडे विचार असणारा, मुस्लिम, काळे इत्यादींविषयी तिरस्कार करणारा असा हा इसम दोन वर्षांपूर्वी त्यांनी निवडून दिला. त्याने मग हैदोस घातला. कारण नसताना इराणमध्ये युध्द सुरू केले. जगातल्या सर्व देशांवर आयातशुल्क लागू केले. यामुळे जगभरात हाहाकार उडाला. पण अखेरीला याचा फटका अमेरिकी लोकांनाही बसला. तिथले पेट्रोल आणि डिझेलचे भाव दोन वर्षात दुप्पट झाले. इतर वस्तूंच्या किमतीही वाढल्या. तेव्हा अमेरिकी लोकांना जाग आली. शेवटी मंगळवारी झालेल्या मध्यावधी निवडणुकांमध्ये त्यांनी ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला जबरदस्त धूळ चारली. अमेरिकेत अध्यक्ष हा सर्वेसर्वा असला तरी त्याच्यावर तेथील संसदेचा म्हणजे काँग्रेसचा अंकुश असतो. या काँग्रेसची दोन सभागृहे असतात. सिनेट आणि हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज. अमेरिकेत वन नेशन वन इलेक्शनचा मूर्खपणा अजून तरी नाही. त्यामुळे तेथे दर दोन वर्षांनी निवडणुका होत असतात. त्यानुसार सिनेटमधल्या ३५ आणि लोकप्रतिनिधीगृहाच्या ४३५ जागांच्या निवडणुका परवा पार पडल्या. या दोहोंमध्येही डेमॉक्रॅटिक पक्षाची त्सुनामी आली. या दोन्ही सभागृहांमध्ये डेमॉक्रॅटिक पक्षाने म्हणजे ट्रम्प यांच्या विरोधकांनी मजबूत पकड मिळवली आहेत. ट्रम्प यांच्या कारकीर्दीची अजूनही दोन वर्षे बाकी आहेत. पण त्यांना आता मनमानी फतवे काढता येणार नाहीत. संसदेतील विरोधी बहुमताने त्यांच्या नाकात सणसणीत वेसण घातली गेली आहे.

गरळ ओकणाऱ्यांना धडा

गेली दोन वर्षांपासून ट्रम्प यांची अमेरिका आणि मोदींचा भारत यांच्यात कमालीचे साम्य निर्माण झाले होते. विद्वेषी, खुनशी राजकारण सुरू होते. स्थलांतरितांविरुध्द मोहिम राबवण्याच्या नावाखाली पोलिसी दडपशाही केली गेली. आपल्या विरोधात बोलणारे पत्रकार, अधिकारी यांना दडपले गेले. त्यांच्याविरुध्द एफबीआयच्या चौकशा लावल्या गेल्या. या निवडणुकीत त्या सर्वांचा कळस झाला. इकडे भारतात मतदार तपासणीच्या नावाखाली जो नंगानाच चालू होता तसाच प्रकार ट्रम्प यांनी केला. कॅलिफोर्नियामध्ये ऐन मतदानाच्या दिवशी वीस हजार मते ही संशयास्पद आहेत असा कांगावा करून ती बाद ठरवण्याचा प्रयत्न केला. मतदारसंघांची आपल्याला हवी तशी फेररचना केली गेली. मुस्लिमांविरुध्द सतत विष ओकले गेले. मिशिगनमध्ये डेमॉक्रॅटिक उमेदवार अल सईद हे दहशतवादी आहेत असे ट्रम्प म्हणत होते. वास्तविक सईद हे अमेरिकतच जन्मलेले आहेत. पण ते मुस्लिम आहेत म्हणून ते निवडून आलेच तर त्यांना सिनेटमध्ये येताना मेटल डिटेक्टरमधून यावे लागेल असा प्रचार ट्रम्प करत होते. मूळच्या सोमालियाच्या असलेल्या एका महिला उमेदवाराने तिच्या सख्ख्या भावाशीच लग्न केले आहे अशी खोटी टीका जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा अध्यक्ष करीत होता. इतकेच नाही तर प्रचारातील तो त्याचा मुख्य मुद्दा होता. आपल्याकडे सोनिया गांधींविरुध्द ज्या प्रकाराची गटारी भाषा भाजपवाले वापरत असतात त्याची आठवण व्हावी असाच हा सगळा प्रकार होता. जसे आपल्याकडे भाजपचा गुजरात तसा रिपब्लिकनांचा टेक्सास. या राज्यात बायबलमधील टेन कमांडमेंट्स शाळेत पोस्टर करून लावण्याचा आदेश काढण्यात आला होता. आपल्याकडे शाळेत सरस्वतीवंदना किंवा गायत्री मंत्र सक्तीचा करण्याचे प्रकार होतात तसाच हा ख्रिश्चन अमेरिकी प्रकार होता. पण त्याला तिथल्या ख्रिश्चन जनतेनेच कडाडून विरोध केला. इतकेच नाही तर एक टेलेरिको हे ख्रिश्चन धर्मगुरुच ट्रम्प यांच्या पक्षाच्या विरोधात उभे ठाकले. विशेष म्हणजे ट्रम्प यांनी आकाशपाताळ एक करूनही मतदारांनी त्यांना जुमानले नाही. ट्रम्प यांचा धर्मांध व विद्वेषी प्रचार अमेरिकी लोकांनी स्पष्टपणे नाकारला ही या निवडणुकीतील सर्वात दिलासादायक बाब आहे. भारतीयांनी आता तरी त्यापासून धडा घ्यायला हवा.

चौकशा लागतील

सिनेट हे आपल्या राज्यसभेसारखे पण अधिक शक्तीशाली सभागृह आहे. अध्यक्ष करीत असलेल्या नेमणुका तसेच परदेशांसोबतचे करार इत्यादी रोखण्याचे हक्क याला आहेत. शिवाय यातील सदस्य सर्व ५० राज्यांमधून थेट निवडून येत असतात. त्यामुळे त्यांना लोकमताचे पाठबळ असते. लोकप्रतिनिधीगृहाला खर्चाला मंजुरी देण्याचे अधिकार असतात. तसेच ही दोन्ही सभागृहे अध्यक्षांच्या व प्रशासनाच्या कारभाराची चौकशी करू शकतात. अध्यक्षासह कोणालाही ते आरोपी असल्याप्रमाणे समोर बोलावून चौकशी करू शकतात. यांची सुनावणी ही न्यायालयांच्या सुनावणीइतकीच प्रभावी असते व त्यात दोषी असल्याचा ठपका आला तर भल्याभल्यांना जावे लागते. कालच वॉशिंग्टन पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार, संसदेत आपले बहुमत येणार हे लक्षात येताच ट्रम्प यांच्या कोणकोणत्या धोरणांची व भानगडींची चौकशी करायची याची तयारी तात्काळ सुरू झाली आहे. त्याचे परिणाम येत्या काही काळात दिसतील. एपस्टीन फाईलसारखी प्रकरणे कदाचित पुन्हा बाहेर येतीलच. शिवाय आपले अदानी किंवा अमेरिकेतलेच एलॉन मस्क यांच्याबाबत पडद्याआड काही काळे धंदे झाले काय हेही यामुळे कदाचित प्रकाशात येईल. नरेंद्र मोदींना ट्रम्प यांनी अलिकडे बरेच कोंडीत पकडले होते. त्यापायी ट्रम्प यांची भेट होईल अशा ठिकाणी जाण्याचे मोदी टाळत होते. ते कदाचित आता सुटकेचा निश्वास टाकतील. पण दुसरीकडे अदानीच्या प्रकरणांची चौकशी नव्याने झाली तर नव्या भानगडी बाहेर येऊ शकतील. दुसरे म्हणजे ट्रम्प यांना आता गमावण्यासारखे काहीच राहिलेले नाही. नियमानुसार ते आता पुन्हा अध्यक्षपदासाठी उभे राहू शकत नाहीत. २०२८ मध्ये रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार अध्यक्षपदी जिंकण्याची शक्यता आता खूपच कमी झाली आहे. अशा स्थितीत ट्रम्प हे इराणवर आणखी हल्ले करून आपला कसा विजय झाला अशी स्टोरी तयार करता येते का हे पाहण्याची दाट शक्यता आहे. अर्थात तसे झाले तर जगभर उसळलेली महागाई कडेलोटाच्या पार जाईल व भारतातही याचे दारुण परिणाम होतील. दरम्यान, भारतातील मोदी सरकारचा मुस्लिमद्वेष आणि पत्रकारांना दडपण्याचे प्रयत्न याबद्दल डेमॉक्रॅटिक पक्षाने वारंवार टीका केली आहे. आता तो पक्ष सत्तेत आल्याने किती अधिक कडक भूमिका घेतो हे पाहणे उद्बोधक असेल. एक मात्र नक्की, मल्लिकार्जुन खर्गे यांनी वेगळ्या संदर्भात वेगळ्या नेत्यांचा बाप काढल्याने आपल्याकडे भाजपवाल्यांनी गदारोळ केला. पण आता जगभरातील हुकुमशहा व माजोरड्या सत्ताधाऱ्यांचा ट्रम्प नावाचा बाप जबरदस्त हरला आहे. त्यामुळे कोणीही अमरपट्टा घेऊन आलेले नाही हे भाजपवाल्यांनी आता तरी समजून जावे.

विचार

समृद्धी नेमकी कशात मोजायची?

भारतीय संस्कृतीत धनाला महत्त्व दिले गेले आहे; परंतु धनाचा अर्थ केवळ नाणे किंवा संपत्ती एवढाच मर्यादित नाही. अन्नधान्य, पशुधन, भूमी, जलसंपदा, ज्ञान, आरोग्य, कौशल्य आणि कुटुंबातील आनंद हीदेखील समृद्धीचीच रूपे आहेत. पूर्वीच्या समाजजीवनात माणसाची श्रीमंती त्याच्या घरातील धान्यसाठा, जनावरे, शेती, कुटुंबाचे आरोग्य आणि समाजातील प्रतिष्ठा यांवरूनही ओळखली जात असे.



धनत्रयोदशी आली की घराघरांत खरेदीची लगबग सुरू होते. सोने, चांदी, नवीन भांडी, वाहन, घरगुती उपकरणे आणि विविध वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा सजतात. शुभमुहूर्तावर खरेदी करणे, घरात नवीन वस्तू आणणे आणि लक्ष्मीचे स्वागत करणे ही परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे. या परंपरेत आनंद आहे, श्रद्धा आहे आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी काहीतरी चांगले करण्याची आकांक्षाही आहे.

मात्र, या निमित्ताने एक प्रश्न विचारावासा वाटतो. समृद्धी म्हणजे नेमके काय? आपल्या घरात किती वस्तू आहेत, बँकेत किती पैसे आहेत किंवा आपण किती महागड्या वस्तू खरेदी करू शकतो, यावर समृद्धी ठरते का? की आपल्या जीवनात आरोग्य, समाधान, सुरक्षितता, निसर्गसंपत्ती आणि सामाजिक सलोखा किती आहे, यावर तिचे खरे मोजमाप करायला हवे?

भारतीय संस्कृतीत धनाला महत्त्व दिले गेले आहे; परंतु धनाचा अर्थ केवळ नाणे किंवा संपत्ती एवढाच मर्यादित नाही. अन्नधान्य, पशुधन, भूमी, जलसंपदा, ज्ञान, आरोग्य, कौशल्य आणि कुटुंबातील आनंद हीदेखील समृद्धीचीच रूपे आहेत. पूर्वीच्या समाजजीवनात माणसाची श्रीमंती त्याच्या घरातील धान्यसाठा, जनावरे, शेती, कुटुंबाचे आरोग्य आणि समाजातील प्रतिष्ठा यांवरूनही ओळखली जात असे. आज आर्थिक प्रगतीचे निकष बदलले आहेत; पण जीवनासाठी आवश्यक असलेल्या या मूलभूत संपत्तीचे महत्त्व कमी झालेले नाही.

धनत्रयोदशीला भगवान धन्वंतरीच्या पूजनाची परंपराही आहे. आरोग्य आणि संपत्ती यांचा परस्परसंबंध या परंपरेतून अधोरेखित होतो. पैसा असला, महागडे घर असले आणि आधुनिक सुविधा असल्या, तरी आरोग्य नसेल तर त्या समृद्धीचा आनंद किती काळ घेता येईल? आरोग्य टिकवण्यासाठी स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, पौष्टिक अन्न, पुरेशी झोप आणि निरोगी पर्यावरण आवश्यक आहे. यांपैकी कोणतीही गोष्ट केवळ पैशाने सहज निर्माण करता येत नाही. त्यासाठी निसर्गाची साथ आणि आपल्या जीवनशैलीतील शिस्त आवश्यक असते.

विजयकुमार कट्टी

आज आपण समृद्धीच्या मागे धावताना एक महत्त्वाची गोष्ट विसरत आहोत. आपल्या घरात येणारी प्रत्येक वस्तू कोणत्या ना कोणत्या संसाधनातून तयार होते. सोन्यासाठी खनिजे, वाहनांसाठी धातू आणि इंधन, इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी विविध खनिजे, कपड्यांसाठी कापूस किंवा कृत्रिम तंतू, तर अन्नासाठी जमीन आणि पाणी लागते. या प्रत्येक वस्तूच्या निर्मितीमागे निसर्गातील संसाधनांचा वापर असतो. वस्तू खरेदी करताना आपण तिची किंमत मोजतो; पण तिच्या निर्मितीसाठी खर्च झालेल्या पाण्याचा, ऊर्जेचा, जमिनीचा आणि श्रमाचा विचार करतो का?

खरेदी करण्याचा आनंद नाकारण्याची गरज नाही. सणासुदीला घरासाठी नवीन वस्तू घेणे चुकीचे नाही. मात्र, गरज आणि आकर्षण यांतील फरक समजून घेणे आवश्यक आहे. एखादी वस्तू आपल्याला खरोखर आवश्यक आहे का? तिचा किती काळ उपयोग होणार आहे? तिची दुरुस्ती करता येईल का? ती वापरून झाल्यावर तिचे काय होणार आहे? असे प्रश्न खरेदीपूर्वी विचारले तर आपल्या उपभोगाच्या सवयी अधिक जबाबदार होऊ शकतात. आपण अनेकदा संपत्ती निर्माण करण्यासाठी अधिकाधिक वस्तू जमा करतो; पण त्या वस्तूंची देखभाल, साठवण आणि विल्हेवाट यांचाही खर्च असतो. घरातील कपाटे भरलेली असतात, स्वयंपाकघरात अनेक उपकरणे असतात आणि वापरात नसलेल्या वस्तू जागा व्यापून राहतात. तरीही नवीन वस्तूंचे आकर्षण कमी होत नाही. ही गरज आहे की सवय, याचे आत्मपरीक्षण प्रत्येकाने करायला हवे.

निसर्गाने आपल्याला दिलेली संपत्ती मात्र मर्यादित आहे. पाण्याचा साठा, सुपीक माती, जंगलांचे क्षेत्र आणि जैवविविधता यांचे संवर्धन झाले नाही तर आर्थिक संपत्तीचा उपयोग किती काळ टिकणार? आपण पैसा साठवू शकतो; पण पाऊस निर्माण करू शकत नाही. पाण्याचा अपव्यय करून नंतर पैसे देऊन पाणी विकत घेता येईल; पण नष्ट झालेली नदी, प्रदूषित झालेला भूजलसाठा किंवा नष्ट झालेले जंगल पूर्ववत करण्यासाठी केवळ पैसा पुरेसा नसतो.

धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन भांडे खरेदी करण्याची परंपरा आहे. त्या भांड्यात आपण कोणते अन्न शिजवणार आहोत, त्या अन्नाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या श्रमांचा आपण किती आदर करतो आणि अन्न वाया जाणार नाही याची काळजी घेतो का, हे प्रश्नही महत्त्वाचे आहेत. अन्न हे केवळ बाजारातून विकत घेतलेले उत्पादन नाही. त्यामागे जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, शेतकऱ्याचे श्रम आणि निसर्गातील असंख्य घटकांचे योगदान असते.

खरी समृद्धी म्हणजे स्वतःकडे भरपूर असणे एवढेच नव्हे; तर इतरांच्या मूलभूत गरजांचाही विचार करण्याची क्षमता असणे. आपल्या घरात अन्नाची रेलचेल असताना शेजारी उपाशी राहू नये, आपल्याकडे पुस्तके असताना एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी पुस्तक मिळावे, आपल्या परिसरात हिरवाई असताना इतरांनाही स्वच्छ पर्यावरणाचा लाभ मिळावा, हीदेखील समृद्धीचीच लक्षणे आहेत. धनत्रयोदशीला लक्ष्मीचे स्वागत करताना आपण आपल्या घरातील संपत्तीचीच नव्हे, तर निसर्गाने दिलेल्या संपत्तीचीही जाणीव ठेवूया. आपल्या गरजा पूर्ण करताना इतरांच्या गरजांवर अतिक्रमण होणार नाही, पुढील पिढ्यांसाठी संसाधने शिल्लक राहतील आणि आपल्या समृद्धीचा लाभ समाजालाही मिळेल, अशी जीवनपद्धती स्वीकारूया.

कारण संपत्तीचे खरे मूल्य ती किती आहे यात नसते; तर तिचा उपयोग किती सुज्ञपणे, किती जबाबदारीने आणि किती जणांच्या कल्याणासाठी होतो, यात असते.

या धनत्रयोदशीला स्वतःला एक प्रश्न विचारूया आपण घरात किती धन आणत आहोत, यापेक्षा आपल्या जगण्यात किती समृद्धी निर्माण करीत आहोत?

चर्चा आजची

फटाके म्हणजे आनंद की प्रदूषणाची समस्या

सुयोग आंग्रे

भारत हा सण आणि उत्सवांचा देश आहे. येथे वर्षभर विविध सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. या सर्व सणांमध्ये 'दिवाळी' हा दिव्यांचा सण सर्वात मोठा आणि आनंदाचा मानला जातो. पौराणिक कथेनुसार, प्रभू रामचंद्र चौदा वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले, तेव्हा अयोध्येतील लोकांनी दीप प्रज्वलित करून त्यांचे स्वागत केले होते. मात्र, आधुनिक काळात हा दिव्यांचा सण 'फटाक्यांचा सण' बनला आहे. दिवाळी असो, लग्नसोहळा असो, क्रिकेटचा सामना असो की राजकीय विजय, आनंद साजरा करण्यासाठी फटाके फोडणे ही एक प्रथा बनली आहे. परंतु, क्षणाचा आनंद देणारे हे फटाके आज आपल्या पर्यावरणासाठी आणि आरोग्यासाठी एक मोठा शाप ठरत आहेत. फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण ही आजच्या काळातील एक गंभीर समस्या बनली आहे. फटाके फोडल्यामुळे सर्वात जास्त नुकसान हवेचे होते. फटाके बनवण्यासाठी सल्फर डायऑक्साइड, चारकोल, पोटॅशियम नायट्रेट, शिसे, मॅग्नेशियम आणि कॅडमियम यांसारख्या घातक रसायनांचा वापर केला जातो. जेव्हा फटाका फुटतो, तेव्हा ही रसायने हवेत जळतात आणि अत्यंत विषारी वायू तसेच सूक्ष्म कण हवेत सोडतात.

दिवाळीच्या काळात किंवा सणासुदीच्या दिवसांत शहरांमधील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावते. अनेक शहरांवर विषारी धुक्याची चादर पसरते. हा विषारी वायू कित्येक दिवसांपर्यंत हवेत तसाच राहतो. आपण जेव्हा या हवेत श्वास घेतो, तेव्हा ही विषारी रसायने आपल्या फुफ्फुसात जातात. यामुळे दमा, खोकला, ब्रॉन्कायटिस आणि फुफ्फुसाचे गंभीर आजार होतात. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि गर्भवती महिलांना याचा त्रास जास्त होतो. फटाके केवळ हवाच दूषित करत नाहीत, तर मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषणही करतात. बाजारात मिळणारे अनेक फटाके हे ठरवून दिलेल्या डेसिबल मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने जास्त आवाज करतात. अचानक होणाऱ्या या मोठ्या आवाजामुळे मानवी कानाचे पडदे फाटू शकतात किंवा तात्पुरते अथवा कायमचे बहिरेपण येऊ शकते. या ध्वनी प्रदूषणाचा सर्वात मोठा फटका रुग्णालयातील रुग्णांना आणि वृद्ध लोकांना बसतो. मोठ्या आवाजामुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढतो. माणसांशिवाय मुके प्राणी आणि पक्षी फटाक्यांच्या आवाजाने प्रचंड घाबरतात. फटाक्यांच्या आवाजामुळे कुत्रे, मांजरी घाबरून लपून बसतात, तर अनेक पक्षी आपला जीव गमावतात. फटाके फोडून झाल्यानंतर रस्त्यांवर आणि गल्लीबोळांत कागदाचे तुकडे, प्लास्टिक आणि रासायनिक राखेचे ढीग साचतात. हा कचरा कित्येक दिवस तसाच पडून राहतो. जेव्हा पाऊस पडतो किंवा हा कचरा नाल्यांमध्ये वाहून जातो, तेव्हा ही विषारी रसायने पाण्यात मिसळतात. यामुळे जल प्रदूषण होते आणि पाण्याचे स्त्रोत दूषित होतात. तसेच, जमिनीवर साचलेल्या रासायनिक राखेमुळे मातीची सुपीकताही कमी होते. फटाक्यांमुळे दरवर्षी शेकडो लहान-मोठे अपघात होतात. फटाके फोडताना निष्काळजीपणामुळे हात भाजणे, डोळ्यांना दुखापत होणे किंवा दृष्टी जाणे अशा घटना घडतात. अनेक ठिकाणी फटाक्यांमुळे दुकाने, घरे किंवा कचऱ्याच्या ढिगाऱ्याला आग लागल्याच्या बातम्या आपण ऐकतो. याशिवाय, फटाक्यांवर दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केली जाते, जी प्रत्यक्षात धुराच्या रूपात हवेत विरून जाते. हा पैसा आपण इतर चांगल्या सामाजिक कार्यासाठी किंवा गरजूंच्या मदतीसाठी वापरू शकतो. प्रदूषणाची भीषणता पाहून आता 'हरित फटाके' हा पर्याय समोर आला आहे. हे फटाके पारंपरिक फटाक्यांपेक्षा ३० ते ३५ टक्के कमी प्रदूषण करतात आणि त्यांचा आवाजही कमी असतो. मात्र, पूर्णपणे प्रदूषणमुक्त होण्यासाठी आपल्याला आपली मानसिकता बदलावी लागेल.

फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची भीषणता लक्षात घेऊन भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि सरकारने अनेक कडक पावले उचलली आहेत. वेळेची मर्यादा न्यायालयाने रात्री ८ ते १० या दोन तासांतच फटाके फोडण्याची परवानगी दिली आहे. रात्री १० नंतर फटाके फोडण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. सामान्य फटाक्यांच्या निर्मिती आणि विक्रीवर बंदी घालून सरकारने केवळ हरित फटाके वापरण्याचे आवाहन केले आहे. हे फटाके सीएसआयआर प्रयोगशाळेने विकसित केले असून ते ३० टक्के कमी प्रदूषण करतात. फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्टसारख्या अत्यंत विषारी रसायनांचा वापर करण्यास कायद्याने मनाई केली आहे. रुग्णालये, न्यायालये आणि शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात फटाके फोडण्यास कायद्याने सक्त मनाई आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते.प्रदूषणाविरुद्धच्या या लढ्यात शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सर्वात मोठी भूमिका बजावत आहेत. देशातील विविध शाळांमध्ये दरवर्षी फटाकेमुक्त दिवाळी मोहिमा राबवल्या जातात. जागृती रॅली आणि मानवी साखळी: विद्यार्थी हातामध्ये घोषवाक्यांचे फलक घेऊन रस्त्यांवर रॅली काढतात आणि लोकांना फटाके न फोडण्याचे आवाहन करतात.शाळांमध्ये परिपाठाच्या वेळी सर्व विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक सण साजरा करण्याची आणि फटाक्यांना स्पर्श न करण्याची प्रतिज्ञा दिली जाते. शाळांमध्ये पथनाट्य, चित्रकला स्पर्धा, आणि निबंध स्पर्धांच्या माध्यमातून फटाक्यांचे दुष्परिणाम स्पष्ट केले जातात.फटाक्यांवर खर्च होणाऱ्या पैशातून गरीब मुलांना कपडे, मिठाई किंवा पुस्तके वाटण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना दिली जाते, ज्यामुळे मुलांमध्ये सामाजिक भान निर्माण होते. आपण 'इको-फ्रेंडली' पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. दिवाळी हा दिव्यांचा सण आहे, त्यामुळे फटाके फोडण्याऐवजी घर रंगीबेरंगी दिव्यांनी, पणत्यांनी आणि रांगोळीने सजवावे. फटाक्यांवर खर्च होणाऱ्या पैशातून गरीब मुलांना कपडे, मिठाई किंवा पुस्तके वाटून आपण खऱ्या अर्थाने आनंद साजरा करू शकतो.फटाके फोडून मिळणारा आनंद हा क्षणिक असतो, पण त्यातून निर्माण होणारे प्रदूषण आणि आजार हे दीर्घकालीन असतात. पृथ्वी ही आपली माता आहे आणि तिचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. प्रदूषणमुक्त पर्यावरण हा आपला अधिकार आहे आणि तो टिकवून ठेवणे आपल्याच हातात आहे. म्हणूनच, फटाके टाळा, पर्यावरण वाचवा हा संकल्प केवळ बोलण्यापुरता न ठेवता प्रत्यक्षात आणण्याची गरज आहे. जेव्हा आपण फटाक्यांना 'नाही' म्हणू, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपली वसुंधरा निरोगी आणि आनंदी होईल.

लोकसंसद

दीपावलीचे महत्व मुलांना सांगा !

दीपावली हा खरेतर दिव्यांचा उत्सव. सध्याच्या पिढीला मात्र याची जाण नाही त्यामुळे दिवाळी म्हणजे फटाके फोडण्याचा उत्सव, असे समीकरण तयार झाले आहे. फटाक्यांमुळे प्रदूषण होते, कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाने बहिरेपणा येतो, अपंगत्व येते, ठिकठिकाणी आगी लागून वित्तीय हानी होते हा सर्व भाग तर आहेच; मात्र ही सर्व दुखणी आपण स्वतःहून विकत घेतलेली असतात, हेही सत्य नाकारून चालणार नाही. फटाके फोडणे म्हणजे एक प्रकारे पैसे जाळणे असेच म्हणावे लागेल. एकट्या महाराष्ट्रात दरवर्षी शेकडो कोटी रुपये निव्वळ दिवाळीच्या काळात फटाक्यांवर उधळले जातात. दुष्काळाने होरपळणाऱ्या आणि काही सहस्र रुपयांच्या कर्जापायी आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या महाराष्ट्राला हे नक्कीच परवडणारे नाही. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी धनसंचय करण्याची शिकवण देणाऱ्या कुबेराचीही पूजा केली जाते. आणि दुसरीकडे श्रीलक्ष्मीच्या कृपेने प्राप्त झालेले धन फटाक्यांवर जाळून उधळले जाते हा विरोधाभास आपण लक्षात कधी घेणार? मुलांनी कितीही हट्ट केला, तरी त्याचे सर्वच हट्ट आपण पुरवत नसतो. हट्ट पुरवताना त्यातुन त्याची हानी तर होणार नाही ना हा साधा विचार आपण करतोच मग मुलांना फटाके आणून देतांना हा विवेक कुठे जातो? मुळात फटाके फोडणे ही आपली संस्कृतीचं नव्हे, मग तिचे पोषण आपण का करावे? दीपावली सणामागील शास्त्र लक्षात घेऊन ते आतापासूनच मुलांवर बिंबवणे आणि दीपावली सणाला आलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिचे मूळ स्वरूप तिला मिळवून देणे ही आपलीच जबाबदारी आहे.

– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

दिनविशेष

धनत्रयोदशी



कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षातील त्रयोदशी तिथीमुळे धनत्रयोदशीचा सण साजरा केला जातो. भगवान धन्वंतरी या दिवशी समुद्रमंथनात अवतरले होते. म्हणूनच त्यांची पूजा केली जाते. त्याचबरोबर अकाली मृत्यू टाळण्यासाठी दक्षिण दिशेला किंवा घराच्या मुख्य दरवाजावर यमराजासाठी पिठाचा दिवा ठेवावा. त्यामुळे यमराज प्रसन्न होतात. धनत्रयोदशीला खरेदीसोबतच भगवान धन्वंतरीचीही पूजा केली जाते.

धनत्रयोदशी कथा : धनत्रयोदशी या सणामागे एक मनोवेधक कथा आहे. कथित भविष्यवाणी प्रमाणे हेमा राजाचा पुत्र आपल्या सोळाव्या वर्षी मृत्युमुखी पडणार असतो. आपल्या पुत्राने जीवनाची सर्व सुख उपभोगावीत म्हणुन राजा व राणी त्याचे लग्न करतात. लग्नानंतर चवथा दिवस हा तो मृत्युमुखी पडण्याचा भयंकर दिवस असतो. या रात्री त्याची पत्नी त्यास झोपू देत नाही. त्याच्या अवतीभवती सोन्या चांदीच्या मोहरा ठेवल्या जातात. महालाचे प्रवेशद्वार ही असेच सोन्या चांदीने भरून रोखले जाते. सर्व महालात मोठमोठ्या दिव्यांनी लखलखीत प्रकाश केला जातो. ती त्यास वेगवेगळी गाणी व गोष्टी सांगून जागे ठेवते. जेव्हा यम राजकुमाराच्या खोलीत सर्परूपात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा त्याचे डोळे सोन्या चांदीने दिपतात. यम यमलोकात परततो: या कारणास्तव यम आपल्या जगात यमलोकात परततो. अशा प्रकारे तिने राजकुमाराचे प्राण वाचवले. म्हणूनच या दिवसास यमदीपदान असेही म्हणतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात. त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात. याने अपमृत्यू टळतो असा समज आहे. धनत्रयोदशीबद्दल अजून एक दंतकथा आहे. इंद्राने जेव्हा असुरांना बरोबर घेऊन समुद्र मंथन केले, तेव्हा त्यातून या दिवशी देवी लक्ष्मी प्रगट झाली. त्याच वेळी समुद्रातून धन्वंतरी अमृतकुंभ बाहेर घेऊन आला. म्हणून धन्वंतरीचीही या दिवशी पूजा केली जाते. म्हणून या दिवसास धन्वंतरी जयंती असेही म्हणतात.

धनत्रयोदशीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की, धनत्रयोदशीला लक्ष्मीची पूजा केल्याने घरात धन, सुख आणि समृद्धी येते. यासोबतच संपत्तीचा देव कुबेर यांचीही पूजा या दिवशी केली जाते. हिंदू मान्यतेनुसार, भगवान विष्णूचा अवतार भगवान धन्वंतरी यांचा जन्म धनत्रयोदशीच्या दिवशी झाला होता. त्याची पूजाही केली जाते. आश्विन पौर्णिमा ही वर्षातील सर्वांत सुदर रात्र त्यानंतर पंधरा दिवसांनी येणारी अमावास्या ही काळोखाची असली तरी आपण भारतीय लोक दिवे लावून ती आपल्या परीने अधिकाधिक सुंदर करण्याचा प्रयत्न करतो. पौर्णिमेच्या रात्रीला निसर्गानेच सौदर्याचे लेणे बहाल केले आहे. या अमावास्येच्या रात्रीला मात्र आपण आपल्या थिट्या प्रयत्नांनी का होईना पण अधिक सुंदर बनविण्याचा प्रयत्न करीत असतो. हा दिवाळीचा सण धनत्रयोदशीपासून सुरू होतो.

धनत्रयोदशी हीच धन्वंतरी जयंतीही आहे. धन्वंतरी म्हणजे समुद्रमंथनातून जी चौदा रत्ने निघाली, त्यापैकी एक प्रमुख रत्न. धन्वंतरी हे आयुर्वेदाचे मूळ निर्माते. देवांचे राजवैद्य! कोणालाही अकाली मृत्यू येऊ नये, अशा उदात्त विचाराने सुरू झालेल्या दिवाळी या सणाच्या प्रारंभी धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी जयंतीची सांगड घातली जाणे हे खरोखरच मोठे सूचक आहे, नाही? वैद्यकशास्त्र तरी दुसरे काय करते? अकाली मृत्यू येऊ नये म्हणून धडपड करते. प्रकृती बरी राहावी, मृत्यू दूर असावा, यासाठी मार्गदर्शन करते. धार्मिक आचरणातून आपण अकाली मृत्यू टाळावा म्हणून यमराजाचे सांगणे ऐकून त्याप्रमाणे पिढ्यान्पिढ्या दक्षिणेकडे तोंड करून दिवे लावतो. धर्म आणि आरोग्य या दोन्ही गोष्टी धनत्रयोदशीच्या निमित्ताने अशा एकत्र आल्या आहेत.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ नोव्हेंबर

१) श्रीम.संध्या अनिल काठे
मु.किहीम, अलिबाग,
दि.६-११-१९५२

२)श्री.रमेश गणपत पाटील
मु.कुरूळ, अलिबाग
दि.६-११-१९५३

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



अशोक महादेव पाटील
स्मरणार्थ अलिबाग

टोरेंटविरोधात कर्जतकरांचा एल्गार



(छायाचित्र : संजय गायकवाड)

- दोन्ही प्रकल्प रद्द करण्याचे मुख्यमंत्र्यांना निवेदन
- वृक्षतोड, बांधकाम तत्काळ थांबविण्याची मागणी
- आठ दिवसांत उत्तर देण्याचा अल्टिमेटम

। कर्जत । प्रतिनिधी ।

सह्याद्रीचे जंगल, शेती आणि जलस्रोत उद्ध्वस्त करून कोणता विकास साधणार, असा सवाल उपस्थित करत टोरेंट कंपनीचे साईडोंगर-१ आणि साईडोंगर-२ हे दोन्ही पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी कर्जतकरांनी एल्गार पुकारला आहे. कर्जत तालुका पर्यावरण बचाव संघर्ष समिती, शेतकरी, आदिवासी बांधव आणि ग्रामस्थांनी मुख्यमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत सविस्तर निवेदन देत प्रकल्पाशी संबंधित वृक्षतोड, जंगलतोड आणि बांधकामांना तातडीने स्थगिती देण्याची मागणी केली.

साईडोंगर-१ (३,००० मेगावॅट) आणि साईडोंगर-२ प्रकल्पांमुळे जंगल, शेती, नद्या, जलस्रोत आणि आदिवासींचे पारंपरिक हक्क धोक्यात येणार असल्याची भीती समितीने व्यक्त केली. दोन्ही प्रकल्पांचा स्वतंत्र नव्हे, तर संयुक्त पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करावा. पेज नदीसह पाली-भुतिवली, पोशीर आणि शिलार परिसरातील जलस्रोतांवर होणाऱ्या परिणामांची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.

प्रकल्पाचे डीपीआर, पर्यावरणीय अहवाल, वनविभागाच्या परवानग्या, वृक्षतोडीचा तपशील, ग्रामसभांचे ठराव, आदिवासींचे वनहक्क, जमीन अधिग्रहण, पुनर्वसन, जलवैज्ञानिक अहवाल आणि कंपनी-शासनातील करार अशी सर्व कागदपत्रे सार्वजनिक करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच मंजुरी प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करून बाधित ग्रामस्थ आणि पर्यावरणतज्ज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदन प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत कार्यवाहीचा अहवाल आणि मागितलेल्या कागदपत्रांबाबत लेखी उत्तर द्यावे, असा अल्टिमेटम समितीने दिला आहे. आम्हाला विनाश नको, शाश्वत विकास हवा. कर्जतची जंगलसंपत्ती, पाणी, शेती आणि भूमीपुत्रांचे अस्तित्व धोक्यात घालणारे प्रकल्प रद्द होईपर्यंत संघर्ष थांबणार नाही, असा इशाराही समितीने दिला. यावेळी समितीचे पदाधिकारी आणि पाली गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रायगडमध्ये बांबू उद्योगाचे आदर्श मॉडेल उभारणार

- पालकमंत्री भरत गोगावले यांचे प्रतिपादन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी व्हीबीजी रामजी योजनेतून अडीच एकर क्षेत्रासाठी सात लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी बांबू लागवड आणि त्यावर आधारित उद्योगातून आर्थिक समृद्धी साधावी. रायगडमध्ये बांबू उद्योगाचे आदर्श मॉडेल उभारण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री भरत गोगावले यांनी केले.

मुरुड तालुक्यातील शिरगाव येथे ग्रीन केन बांबू वर्ल्ड असोसिएशनच्या सामाईक सुविधा केंद्राचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, तहसीलदार आदेश डफल, पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, जिल्हा उद्योग केंद्राचे उपायुक्त जी. एस. हरळय्या आणि असोसिएशनचे रुपेश जामकर उपस्थित होते.

व्हीबीजी रामजी योजनेतून अडीच एकर क्षेत्रावर बांबू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना चार वर्षांच्या देखभालीसह टप्प्याटप्प्याने सात लाखांचे अनुदान मिळणार आहे. चार ते पाच वर्षांनी बांबूची कापणी करता येत असल्याने शेतकऱ्यांना दीर्घकालीन उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होऊ शकतो. बांबूपासून फर्निचर, सजावटीच्या वस्तू, ग्लास, पेन, टूथब्रश यांसारखी उत्पादने तयार करण्यासाठी सामाईक सुविधा केंद्रात आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध होणार आहे. बांबूरोपांच्या निर्मितीसाठी टिश्यू कल्चर प्रयोगशाळेला जिल्हा नियोजन समितीतून सुमारे ५० लाखांची मदत देण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेतल्याचे गोगावले यांनी सांगितले. तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योग-व्यवसायाकडे वळावे, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रायगडमध्ये बांबू उद्योगातून स्वतंत्र स्थानिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता असल्याचे सांगितले. मागील वर्षी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सुमारे ३२ लाख बांबू रोपांची निर्मिती करून वितरण करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद आणि प्रशासनाच्या माध्यमातून ८११ ग्रामपंचायतींमध्ये बांबू लागवड करण्यात आली आहे. सध्या क्लस्टरसाठी रत्नागिरी, चंद्रपूर आणि आसाम येथून बांबू आणावा लागत असून, स्थानिक उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा उद्योग केंद्राचे उपायुक्त जी. एस. हरळय्या यांनी प्रास्ताविकात सांगितले की, रायगडमधील हा पहिला बांबू क्लस्टर असून सुमारे ८ कोटी १० लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे.

प्रलंबित मतदार अर्जांचा वेळेत निपटारा करा

- मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांचे निर्देश

। मुंबई । प्रतिनिधी ।

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर-२०२६) प्रक्रियेंतर्गत प्राप्त दावे आणि हरकतींचा एकही अर्ज प्रलंबित ठेवू नका. सर्व अर्जांचा मुदतीत आणि पारदर्शकपणे निपटारा करा, असे निर्देश महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले. बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात गुरुवारी (५ नोव्हेंबर) एसआयआर-२०२६ कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त अश्विनी भिडे उपस्थित होत्या. दावे व हरकतींवर दक्षतेने कार्यवाही करावी. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मुदतवाढीचा विचार करून प्रक्रिया घाईघाईने न उरकता काळजीपूर्वक आणि पारदर्शकपणे पूर्ण करावी, अशा सूचनाही चोक्कलिंगम यांनी यावेळी दिल्या. बैठकीला अतिरिक्त आयुक्त, मतदार यादी निरीक्षक आणि मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

कुंभमेळ्याच्या ३६ हजार कोटींत ५० टक्के मलई

- फडणवीस सरकारवर हर्षवर्धन सपकाळ यांचा भ्रष्टाचाराचा आरोप

। मुंबई । प्रतिनिधी ।

पवित्र कुंभमेळ्याच्यानावाखाली विकासकामांऐवजी भ्रष्टाचाराचा कुंभ भरला जात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. नाशिक कुंभमेळ्यासाठी मंजूर केलेल्या ३६ हजार कोटींच्या निधीत तब्बल ५० टक्के मलई खाल्ली जात असल्याचा दावा त्यांनी केला. तर गोकुळ दूध संघात आडमार्गाने सत्ता मिळवण्यासाठी कायद्यात बदल करून भाजपा-महायुती सरकार सहकार क्षेत्रच मोडीत काढत असल्याची टीका ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.

नाशिक येथे काँग्रेसच्या उत्तर महाराष्ट्र विभागातील पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सपकाळ यांनी कुंभमेळ्याच्या कामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मंडपासाठी २२ कोटी, हेलिपॅडसाठी ३ कोटी आणि सीसीटीव्हीसाठी ३५० कोटी रुपये खर्च केले जात असल्याचे सांगत, विकासकामांच्या नावाखाली पद्धतशीरपणे भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. अनेक कामे अपूर्ण असताना बोगस वर्क ऑर्डर काढल्या जात असल्याने नाशिककर त्रस्त असल्याचेही ते म्हणाले. भ्रष्टाचारासाठीच मुख्यमंत्र्यांनी विशेष मंत्र्याची नियुक्ती केल्याचा आरोप करत, सरकारने पवित्र कुंभमेळाही सोडला नसल्याची टीका त्यांनी केली.

दरम्यान, गोकुळ दूध संघाच्या मुद्द्यावरून बाळासाहेब थोरात यांनी सरकारवर निशाणा साधला. सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या पॅनलला स्पष्ट बहुमत असतानाही कोरमचे कारण पुढे करून अध्यक्ष निवड रोखण्यात आली. आता सरकारने कायद्यात बदल करून चार सरकारी सदस्य नियुक्त करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. हा प्रकार केवळ गोकुळपुरता मर्यादित न राहता संपूर्ण सहकार क्षेत्राला बाधक ठरेल. भाजपा-महायुती सरकार सहकार क्षेत्र मोडीत काढण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप थोरात यांनी केला.

धनत्रयोदशीला वाहन खरेदीचा धूमधडाका

- दुचाकींसह चारचाकींच्या शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर सोने-चांदी खरेदीबरोबरच नवीन वाहन घरी आणण्याची परंपरा यंदाही कायम असून, पनवेलमध्ये वाहन खरेदीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. दुचाकींपासून चारचाकींपर्यंत विविध वाहनांच्या शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी होत असून, नव्या मॉडेल्सना चांगली पसंती मिळत आहे.

धनत्रयोदशीला नवीन वस्तू आणि वाहन खरेदी करणे शुभ मानले जाते. यामुळे अनेकांनी या मुहूर्तासाठी वाहनांची आगाऊ नोंदणी केली आहे,



तर काही ग्राहक शोरूममध्ये जाऊन विविध मॉडेल्सची माहिती घेत आहेत. कुटुंबासाठी चारचाकी खरेदी करण्याकडे अनेकांचा कल असून, तरुणाई आकर्षक दुचाकींना पसंती देत आहे. वाहन निवडताना रंग, डिझाइन, मायलेज आणि आधुनिक सुविधांचा विचार केला जात आहे.

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी वाहन विक्रेत्यांकडून विविध सवलती, आकर्षक फायनान्स योजना आणि कमी डाउन पेमेंटचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर नवीन वाहनाची पूजा करून ते घरी नेण्याची तयारी अनेक कुटुंबांनी केली आहे.

वेतन थकल्याने कामगारांचे काम बंद आंदोलन

। उरण । प्रतिनिधी ।

द्रोणागिरी-पागोटे येथील डी. आर.टी.ए. सीएफएस, कॉनकोर येथे कार्यरत १११ कामगारांचे चार महिन्यांचे वेतन थकल्याने काम गारांवर उपासमारीची वेळ आली आहे. वारंवार मागणी करूनही वेतनाचा प्रश्न न सुटल्याने गुरुवार, ५ नोव्हेंबरपासून कामगारांनी सीएफएसचे काम बंद करून कंपनीच्या गेटसमोर आंदोलन सुरू केले आहे.

मे. सॅम सर्वेअर्स अँड ॲडजेस्टर्स या कंत्राटदारामार्फत लेबर, सुपरवायझर आणि सर्वेअर पदांवर हे कामगार कार्यरत आहेत. जून ते सप्टेंबर २०२६ या चार



- कॉनकोरच्या गेटसमोर रायगड श्रमिक संघटनेचे आंदोलन
- मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र लढ्याचा इशारा

महिन्यांचे वेतन बेकायदेशीररीत्या कपात केल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. याबाबत वारंवार चर्चा करूनही न्याय न मिळाल्याने रायगड श्रमिक संघटनेच्या माध्यमातून कामगार नेते भूषण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन छेडण्यात आले आहे. मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने प्रशासनाला दिला आहे. आंदोलनाच्या पहिल्या दिवशी भूषण पाटील, ॲड. भार्गव पाटील, जितेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रेरणा कुणाल पाटील, विजय पाटील, कुणाल पाटील, मनोहर पाटील, आशिष तांडेल, प्रकाश भोईर, रमेश पाटील, अरुण पाटील, विनोद पाटील, रायगड श्रमिक संघटनेचे अध्यक्ष प्राणनाथ पाटील, उपाध्यक्ष भूमित भगत, सेक्रेटरी मितेश पाटील, जगदीश तांडेल यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, पागोटे ग्रामपंचायतीचे सदस्य, ग्रामस्थ, कामगार आणि महिला सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ३ वरुन

अतिक्रमणाचा विळखा

जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे समोर आले आहे.

वनक्षेत्राचे संवर्धन करण्यासाठी बांबू लागवड, विविध रोपांची लागवड आणि संरक्षणाच्या उपाययोजना केल्या जात असताना, दुसरीकडे वनजमिनीवर अतिक्रमणाचा सपाटा सुरू आहे. काहींनी हातभट्ट्या उभारल्या, तर काहींनी अनधिकृत शेड, बांधकामे आणि कुंपणे घातली आहेत. माती व दगड उत्खननासाठीही वनजमिनी बळकावल्या जात आहेत. आतापर्यंत ३ हजार ३४ जणांनी अतिक्रमण केल्याची नोंद असून, त्यापैकी २ हजार ३०१ जणांनी अन्य कामांसाठी वनजमिनीचा ताबा घेतल्याची माहिती आहे. गुन्हे दाखल करून नोटिसा बजावण्यात आल्या असल्या तरी प्रत्यक्ष अतिक्रमण हटविण्याबाबत सरकारी यंत्रणांची उदासीनता दिसून येत आहे. परिणामी स्थानिक वनसंपत्तीचे नुकसान होण्याबरोबरच वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासावरही संकट ओढवले आहे.

एसटीच्या कर्मचाऱ्यांना १० हजारांची दिवाळी भेट

आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या खंबीर पाठबळामुळे एसटी महामंडळाचे भविष्य उज्ज्वल असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन अथवा करू नये, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले. एसटी ही सर्वसामान्य प्रवाशांची जीवनवाहिनी आहे. कोणत्याही आंदोलनामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये. कर्मचारी आणि प्रवासी हे एसटीचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर संवादातून मार्ग काढण्यास आम्ही सदैव तयार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

दिवाळीच्या गर्दीत रस्त्याचे काम नको

पुन्हा तोच त्रास नागरिकांच्या माथी मारू नये. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी तातडीने हस्तक्षेप करून एमएसआयडीसीला काम थांबविण्याचे आदेश द्यावेत, असे साकडे घालण्यात आले आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे पुणे, मुंबईसह राज्यभरातून हजारो पर्यटक नागाव, मुरुड आणि अलिबागकडे धाव घेत आहेत. अशा गर्दीच्या काळात कुरुळ ते बेलकडे रस्त्यावर काँक्रिटीकरण सुरू झाल्यास वाहतुकीचा बोजवारा उडण्याची शक्यता आहे. अवघ्या अर्ध्या-एक तासाच्या प्रवासासाठी चार-पाच तास वाहतूक कोंडीत अडकण्याची वेळ नागरिक आणि पर्यटकांवर येत आहे. गेल्या दोन दिवसांपासून काँक्रिटीकरणाच्या हालचाली सुरू झाल्या असून, साहित्यही रस्त्यालगत आणून ठेवण्यात आले आहे. एकेरी मार्गावरील वाहतुकीचा ताण वाढल्यास वाहतूक पोलिसांसमोरही मोठे आव्हान उभे राहणार आहे.

यापूर्वी अशा कोंडीतून वाद आणि हाणामारीच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे भाऊबीजेपर्यंत काम थांबवून त्यानंतरच सुरू करावे, अशी मागणी होत आहे. कामाच्या काळात रस्त्यावर नियमित पाणी मारून धुळीचा त्रासही रोखावा. एमएसआयडीसीचे अधिकारी स्थानिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून काम पुढे रेटत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

एलईडी मासेमारीविरोधात कारवाई

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली मत्स्य व्यवसाय अधिकारी महेश खरात आणि त्यांच्या पथकाने तातडीने कारवाई करत संशयित नौका थांबवून तपासणी केली. यावेळी ३० एलईडी दिवे आणि एक जनरेटर आढळून आला. हे साहित्य जप्त करून मत्स्य व्यवसाय विभागाच्या कार्यालयात जमा करण्यात आले, तर नौका ताब्यात घेऊन मांडवा बंदरात ठेवण्यात आली आहे. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ व सुधारित अधिनियम २०२१ अन्वये संबंधितांवर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

नदीपात्रात अतिक्रमण, उत्खननाचा धुमाकूळ

प्रत्यक्ष पाहणी करून कारवाई करावी, अन्यथा व्यापक जनआंदोलन छेडू, असा इशारा देण्यात आला आहे.

परिसरातील नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर उत्खनन, बांधकामे आणि नदीकाठाला वॉल कंपाऊंड उभारले जात असल्याचे ग्राम स्थांचे म्हणणे आहे. यामुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह बाधित होऊन अतिवृष्टीच्या काळात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे. याबाबत पाटबंधारे विभागाकडे विचारणा केली असता महसूल विभागाकडे, तर तहसीलदार उत्तम कुंभार यांच्याकडे दाद मागितली असता पाटबंधारे विभागाकडे बोट दाखविण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अखेर कारवाई करणार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे.

हेदवळी येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष जोरकर यांनीही प्रशासनाला इशारा दिला आहे. तहसीलदारांना निवेदन देण्यासह पाटबंधारे विभागाकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे. नदीपात्राची अधिकृत हद्द निश्चित करावी, उत्खननाच्या परवानग्यांची तपासणी करावी आणि कथित अनधिकृत बांधकामांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. १५ दिवसांत ठोस पावले उचलली नाहीत, तर नदीकाठच्या गावांतील ग्रामस्थांना एकत्र करून व्यापक आंदोलन छेडण्यात येईल, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

विद्यार्थिनींनी अहिल्यादेवींचे आदर्श विचार जोपासावेत!



(छायाचित्र : महेश पवार)

- आमदार विक्रांत पाटील यांचे आवाहन
- २४२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

। नागोठणे । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर समर्थपणे राज्यकारभार करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे दातृत्व, कर्तृत्व आणि विचार आजही प्रेरणादायी आहेत. विद्यार्थिनींनी त्यांच्या आदर्श विचारांचे आचरण करावे, तसेच बहुजन समाजाने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन आमदार विक्रांत पाटील यांनी केले.

ऑल इंडिया धनगर समाज महासंघ, मुंबई प्रदेश आणि अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्ट, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने नेरुळ येथील तेरणा ऑडिटोरियममध्ये २४२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. शिक्षणातून कुटुंबासह संपूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास साधता येतो. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी संस्था आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

विधानपरिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल खासदार रामराव वडकुते आणि महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रविण काकडे यांच्या हस्ते आमदार विक्रांत पाटील यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून एमपीएससी, यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांत यश मिळवावे आणि कुटुंबाला आर्थिक बळ द्यावे, असे आवाहन खासदार वडकुते यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांनाही पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला महासंघाचे पदाधिकारी, अधिकारी, लोकप्रतिनिधी, उद्योजक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक आदित्य वाघमोडे यांनी केले, तर आभार प्रा. एन.पी. खरजे यांनी मानले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांघई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक दत्तात्रेय किसन हातमोडे, प्रविण किसन हातमोडे व यशवंत किसन हातमोडे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

अ.क्र.	सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकारणी रु.पै.
०१	५५/१	००.४१.२० या एकूण क्षेत्रापैकी ००.२१.००	३.२५

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६ नोव्हेंबर २०२६

ॲड. शरद आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ.सो.लि.
कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गोमाशी, ता. सुधागड, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

जमिन मालकांची नावे	गट नंबर	क्षेत्रफळ हे.आर.	आकार रु.पै.
१) चंद्रकांत राजाराम भऊड	४४५	०-०६-१०	०-७२
२) चेतन चंद्रकांत भऊड ३) मेघा चंद्रकांत भऊड ४) योगेश चंद्रकांत भऊड	४४९	०-६७-३०	६-१२
१) चंद्रकांत राजाराम भऊड २)मेघा चंद्रकांत भऊड	४४८	०-४०-७० पैकी ०-२०-००	२-३४
१) प्रेरणा रुक्मानंद नेवगी २) योगेश चंद्रकांत भऊड	४४७	०-०७-१०	०-८१

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, तावेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६/११/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि.रायगड-४१०२०१.
मोबाईल नंबर ९७६३६८१२५३.

निवडक



वसुबारसनिमित्त गाय-वासराचे पूजन

आगरदांडा : दीपावलीच्या पहिल्या दिवसाला अर्थात वसुबारस (गोवत्स द्वादशी) निमित्त मुरूड तालुक्यात सर्वत्र उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळत आहे. या मंगलमय पर्वाचे औचित्य साधून शेतकरी महिलांनी पारंपरिक पद्धतीने गाय आणि वासराचे पूजन केले. भारतीय संस्कृतीत गायीला मातेचे स्थान असून, तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वसुबारस सण साजरा केला जातो. यानिमित्त महिलांनी गाय-वासराची पूजा करून त्यांना ओवाळले आणि सुख, समृद्धी व भरभराटीसाठी प्रार्थना केली.



पांजरपोळमध्ये दीपोत्सवाची सुरुवात

खांदा कॉलनी : दीपावली सणाच्या पहिल्या दिवसाला म्हणजेच वसुबारसेला गुरुवारी पनवेल परिसरात पारंपरिक उत्साहात सुरुवात झाली. भारतीय संस्कृतीत गाय आणि वासराला विशेष महत्त्व असल्याने वसुबारसेनिमित्त पनवेल येथील पांजरपोळमध्ये गाय-वासरांचे भक्तीभावाने पूजन करण्यात आले. या निमित्ताने पांजरपोळमध्ये सकाळपासूनच भाविकांची लगबग पाहायला मिळाली. महिलांनी गाय आणि वासरांना हळद-कुंकू लावून, फुलांच्या माळा घालून त्यांचे औक्षण केले. तसेच गायीला चारा आणि गुळ खाऊ घालून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. हिंदू धर्मपरंपरेत गायीला मातेचे स्थान दिले जाते. शेती, दुग्धव्यवसाय आणि मानवी जीवनात गायीचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यामुळे वसुबारसेच्या दिवशी गोमातेची पूजा करून कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा आजही जपली जात आहे.



तिवरे शाळेत महिला मेळावा

पाली/ वाघोशी : सुधागड तालुक्यातील रजिप प्राथमिक शाळा तिवरे येथे 'निपुण महाराष्ट्र' कार्यक्रमांतर्गत नुकताच एक अत्यंत उत्साही, मार्गदर्शक व संवादात्मक महिला मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात गावोगावच्या महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी श्रावणी मोरे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना आजच्या काळात मुलांवर योग्य संस्कार कसे करावेत, संस्कारांची खरी गरज का निर्माण झाली आहे. मूल्यवर्धन या विषयाचे महत्त्व काय आहे, यावर सविस्तर प्रकाश टाकला. तसेच उत्तम बाल संगोपन, मुलांसाठी योग्य व पोषक आहार देण्याची जबाबदारी महिलांनी कशी पार पाडावी याविषयी मोलाचा सल्ला दिला. प्रत्येक कुटुंबाची प्रगती साधण्यासाठी आणि समाज मजबूत करण्यासाठी प्रत्येक महिला सक्षम व आत्मनिर्भर बनली पाहिजे, असा संदेश त्यांनी या वेळी दिला. या मेळाव्याचे एक विशेष आणि संस्मरणीय आकर्षण म्हणजे, उपस्थित महिलांच्या हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका श्रावणी मोरे यांच्या 'कोकण' या काव्यसंग्रहाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. महिलांच्या हस्ते झालेल्या या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यामुळे उपस्थितांमध्ये एकच आनंद व अभिमानाचे वातावरण पाहायला मिळाले.

बळीराजाच्या घरात यंदा अंधारच

तळा : दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, नवीन कपडे, फराळ आणि दिव्यांची रोषणाई. मात्र, यंदा तळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या घरात दिवाळी आली आहे की दिवाळे निघाले आहे, असा प्रश्न पडला आहे. शेती हा मुख्य व्यवसाय असलेल्या तळा तालुक्यात यंदा पावसाने दगा दिला. पेरणीच्या वेळी पाऊस लांबला, मधल्या काळात प्रदीर्घ खंड पडला आणि कणीस भरण्याच्या वेळी पाण्याअभावी पीक करपून गेले. ऐन कापणीच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसाने उरलेसुरले पीकही भिजून खराब झाले. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या हातात भातच आले नाही. दरवर्षी दिवाळीला भात विकून आलेल्या पैशातून शेतकरी मुलाबाळांना नवीन कपडे घेतो, घरात फराळ बनतो, कर्जाचा एक हप्ता फेडतो. यंदा मात्र, हातात पैसेच नसल्याने बाजारपेठेतही शुकशुकाट दिसत आहे. पुढच्या हंगामासाठी बियाणे, खतासाठी पैसे कुठून आणायचे, कर्ज कसे फेडायचे, हा प्रश्न त्याला सतावत आहे. एकीकडे शहरात दिव्यांची रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी सुरू असताना दुसरीकडे गावात मात्र, शेतकरी काळजीत आहे. शासनाने तात्काळ मदत जाहीर करून शेतकऱ्याच्या घरात दिवाळीचा खरा आनंद परत आणावा, अशीच अपेक्षा आता सर्वांकडून व्यक्त होत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in Office Education- Bsc/ Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321
- Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

खालापूर तालुक्यात विजेचा लपंडाव

सणासुदीच्या तयारीत नागरिकांचा मनस्ताप, महावितरणच्या कारभारावर संताप व्यक्त

। खोपोली । प्रतिनिधी ।

दिवाळीचा सण काही तासावर येऊन ठेपला असताना खालापूर तालुक्यात मात्र, विजेच्या लपंडावाने नागरिकांची दिवाळीपूर्व तयारीच विस्कळीत केली आहे. तासभर वीजपुरवठा सुरू राहतो, तर पुढील चार-चार तास वीज गायब होते, अशी परिस्थिती अनेक भागांत निर्माण झाली आहे. ऐन सणासुदीच्या काळात महावितरणच्या अनियमित कारभाराचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह महिलांना बसत असून, वीज वितरण कंपनीच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घराघरांत स्वच्छता, रंगरंगोटी, रोषणाई आणि फराळ बनविण्याची लगबग सुरू आहे. मात्र, वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे या कामांमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. विशेषतः महिलांना घरगुती कामांचे नियोजन करताना मोठी कसरत करावी लागत आहे. काही भागांत रात्री उशिरा किंवा मध्यरात्री खंडित झालेली वीज थेट सकाळी सुरू होत असल्याने नागरिकांना रात्र अंधारात काढावी लागत आहे.

अनियमित वीजपुरवठ्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार वर्ग तसेच व्यावसायिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. सणासुदीच्या काळात घरांमध्ये दिव्यांची रोषणाई करण्याची तयारी सुरू असताना प्रत्यक्षात मात्र अंधाराचा सामना करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

वीज वितरण कंपनीकडून देखभाल-दुरुस्तीची कामे केली जात असतील, तर त्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना देणे अपेक्षित आहे. मात्र, कोणतीही ठोस माहिती न मिळता वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि संतापाचे वातावरण आहे. तासभर वीज आणि चार तास अंधार, असा कारभार सुरू असताना महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष आहे की नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणाच्या काळात तरी अखंडित वीजपुरवठा मिळणे ही नागरिकांची रास्त अपेक्षा आहे. त्यामुळे महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खालापूर तालुक्यातील वीजपुरवठ्याचा तातडीने आढावा घेऊन वारंवार होणारे वीजखंडित होण्याचे प्रकार थांबवावेत. अन्यथा, सणाच्या आनंदावर विजेच्या लपंडावाचे विरजण पडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

आनंदावर विरजण पडण्याची भीती

ऐन दिवाळीच्या सुरुवातीलाच वीजपुरवठा खंडित होत असल्याने आनंदावर विरजण पडत आहेत. वीजपुरवठा सुरळीत नसल्याने अनेक घरगुती उपकरणेदेखील खराब होत असल्याचे येथील नागरिक सांगत आहेत. मागील काही दिवसांपासून ऐन दिवाळीच्या काळातदेखील वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे नागरिकांना दिवाळीचा आनंद लुटता येत नाही.

काशिनाथ नागे यांना पदोन्नती

कोलाड : कोलाड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी काशिनाथ नागे यांना पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर पदोन्नती झाल्याने कोलाड परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या पदोन्नतीमुळे पोलीस दलातील सहकारी, मित्रपरिवार आणि परिचितांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागे यांना मिळालेल्या पदोन्नती बद्दल पोलीस अधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवारांकडून त्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



मुरूड तालुक्यात ५७ बंधाऱ्यांची उभारणी

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

यंदा जिल्ह्यात कमी पाऊस झाल्याने आगामी काळात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन पाणीटंचाईवर मात करण्यासाठी राज्य सरकारने विविध विभागांना बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट दिले आहे. त्यानुसार मुरूड तालुक्यातही बंधारे उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे.

मुरूड तालुका कृषी विभागाला एकूण ६० बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून, त्यापैकी आतापर्यंत ४५ बंधाऱ्यांचे काम पूर्ण झाले आहेत. उर्वरित बंधाऱ्यांचे कामही पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती सहायक कृषी अधिकारी मनोज कदम यांनी दिली.

सामाजिक वनीकरण विभागाला १४ बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. हे उद्दिष्ट वाढवून १५ करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. मात्र, आवश्यक मंजुरी मिळत नसल्याने आतापर्यंत १२ बंधारे बांधण्यात आल्याचे माहिती सामाजिक वनीकरण अधिकारी अर्चना डफडे यांनी दिली. दोन्ही विभागांच्या माध्यमातून आतापर्यंत मुरूड तालुक्यात एकूण ५७ बंधाऱ्यांची उभारणी करण्यात आली आहे. या बंधाऱ्यांमुळे पावसाचे पाणी अडवून मुरविण्यास मदत होणार आहे. भूजलपातळी वाढण्यासह आगामी उन्हाळ्यातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी या उपक्रमाचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

धानकान्हे शाळेत दिवाळीनिमित्त कार्यशाळा उत्साहात

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील प्राथमिक शाळा धानकान्हे येथे मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षण व कार्यशिक्षणाचे धडे गिरवण्यासाठी दिवाळी उत्सवासाठी आवश्यक असणारे आकाश कंदील तयार करणे व दिवाळीत वापरात येणाऱ्या दिव्यांची सजावट कशी करावी याबाबतची कार्यशाळा आनंददायी शनिवार उपक्रमातंर्गत मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली. दिवाळी कार्यशाळेत महेशकुमार जगताप यांनी मुलांना आकाश कंदील तयार करणे, तसेच पणत्या सजावटीचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यानंतर मुलांना एकत्रितपणे



घेऊन आकाश कंदील बनवणे व घरी वापरण्यासाठी पणत्यांची सजावट करण्याचे प्रात्यक्षिक करायला लावले. मुलांनी स्वतः बनवलेल्या प्रतिकृतीतून त्यांना आनंद व व्यावसायिक शिक्षण याचा अनुभव या दोन्ही गोष्टी मिळाल्या.

कार्यशाळेतसाठी दत्तात्रेय हळदे, साक्षी तुपकर, तसेच सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, शिक्षक महेशकुमार जगताप यांनी कार्यशाळेला सहकार्य केले.

खांडसमध्ये महिलांनी बांधला बंधारा



। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील खांडस येथील संजीवनी महिला शेतकरी गटाच्या महिला सभासद यांनी तेथील नदीमध्ये वनराई बंधारा बांधला. या गटाच्या प्रमुख गायत्री ऐनकर, सुरेखा डुकरे, मालती जगताप, अनिता जगताप, कुंदा हाबळे, सुनीता ऐनकर, आश्विनी ऐनकर, ज्योती भोपी, प्रमिला भोपी, योगिता ऐनकर, रेशमा ऐनकर, लता ऐनकर, अनिता जगताप आणि नीलम जगताप यांनी श्रमदान केले.

असतात. पाणी अडवण्यासाठी खांडस येथील संजीवनी महिला शेतकरी गट यांनी एकत्र येत वनराई बंधारा बांधला. या गटाच्या प्रमुख गायत्री ऐनकर, सुरेखा डुकरे, मालती जगताप, अनिता जगताप, कुंदा हाबळे, सुनीता ऐनकर, आश्विनी ऐनकर, ज्योती भोपी, प्रमिला भोपी, योगिता ऐनकर, रेशमा ऐनकर, लता ऐनकर, अनिता जगताप आणि नीलम जगताप यांनी श्रमदान केले.

वशेणी गावात रंगणार सुरांची मैफल

। चिरनेर । प्रतिनिधी ।

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही उरण तालुक्यातील वशेणी इतिहास संपादकीय मंडळाच्या वतीने दिवाळीच्या मंगलमय पहाटेला सुरांच्या स्वरमयी मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील वशेणी इतिहास संपादकीय मंडळाच्या वतीने (दि.८) नोव्हेंबर रोजी पहाटे ५:३० वाजता हनुमान मंदिर वशेणी येथे सुरांची स्वरमैफल रसिक श्रोत्यांचे कान तृप्त करणार आहे. या अनुषंगाने दिवाळी पहाट सुरेल गीतांच्या गायनात शिवपार्वती भजन मंडळ महिला नृत्य, विश्वरूपम कला मंच वशेणी नृत्य सादरीकरण आणि सोबत लकी ड्रॉ सोडत हा कार्यक्रम



रंगणार आहे. उरण-पनवेल तालुक्यातील गायक सुरांची उधळण करणार असून, सानिका पाटील, किशोर पाटील, कल्याणी कोळी, मीनाक्षी साळुंखे, श्रद्धा शिवकर, रूपाली पाटील, वेदा पाटील, रवींद्र ठाकूर, संदीप गावंड, सुनील ठाकूर आदी प्रतिभावंत गायक कलावंत यात सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन निसर्ग म्हात्रे, मनीष पाटील, संजना गावंड करणार आहेत. मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी बी जे म्हात्रे, सतीश पाटील, गणेश खोत, अनंत तांडेल, पुरुषोत्तम पाटील, रवींद्र गावंड, रवींद्र गावंड, कैलास पाटील, किशोर म्हात्रे, विश्वास पाटील, मनोज गावंड, राघव म्हात्रे, गणपत ठाकूर, अनंत पाटील, संदेश माळी, हरिश्चंद्र ठाकूर, प्रसाद पाटील, शरद पाटील, रमेश पाटील, संदेश गावंड हे यशस्वी आयोजनाचे काम करत आहेत.

दिवाळी पहाट या सुरेल गीतांच्या कार्यक्रमाला अनामिका म्हात्रे, अविनाश ठाकूर, उरण प्रारंभी गावंड, निलेश म्हात्रे, महादेव कोहक, नरेश मोकाशी, संचित गावंड, शर्मिला गावंड, बळीराम म्हात्रे, हसुराम म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, अनंता माळी, समिधा म्हात्रे, नरेंद्र ठाकूर, दिनेश म्हात्रे, मुकेश म्हात्रे, रमण कासकर आदी मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

मुरूडमध्ये विविध स्पर्धेचे आयोजन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

श्री दत्त देवस्थान ट्रस्ट मंडळ, मुरूड-जंजिरा यांच्या वतीने दिवाळी पहाटनिमित्त रविवार (दि.८) नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता श्री दत्त मंदिर मुरुड या ठिकाणी चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांसह सर्व रांगोळीप्रेमींना सहभागी होता येणार आहे.

चित्रकला स्पर्धेसाठी तीन गट करण्यात आले आहेत. प्रथम गट इयत्ता पाचवी ते सातवी या वर्गासाठी असून, त्यांच्यासाठी 'दिवाळीतील आकाशकंदील बनविणारी मुले' किंवा 'मातीचा किल्ला बनविणारी मुले' हे विषय देण्यात आले आहेत.

द्वितीय गट इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी असून, 'पिण्याच्या पाण्याची टंचाई' किंवा 'शहर स्वच्छता अभियान' हे विषय असतील. तृतीय गट इयत्ता अकरावी, बारावी व खुल्या गटासाठी असून, 'प्रदूषण, उष्णता व अल निनोचे जागतिक परिणाम' हा विषय देण्यात आला आहे.

स्पर्धेसाठी प्रत्येक विद्यार्थ्याला ड्रॉइंग पेपर आयोजकांकडून देण्यात येईल. मात्र, रंगपेटी, पॅड, कंपास पेटी व इतर आवश्यक रंगसाहित्य स्पर्धकांनी स्वतः आणायचे आहे. सहभागी विद्यार्थ्यांनी शाळेचे ओळखपत्र किंवा आधारकार्ड सोबत आणणे आवश्यक आहे.

रांगोळी स्पर्धा सर्वांसाठी खुली असून, 'दत्तगुरूंचे रांगोळीद्वारे चित्रण व रंगभरण' किंवा 'बेटी बचाव' हे विषय देण्यात आले आहेत. रांगोळी रेखाटनासाठी शनिवार (दि. ७) नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून श्री दत्तमंदिर सभागृहात जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रांगोळीसाठी लागणारी सफेद रांगोळी ट्रस्टतर्फे पुरविण्यात येईल.

चित्रकला स्पर्धेसाठी इच्छुकांनी आपली नावे ७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत कोटेश्वरी हेरिटेज बिल्डिंग येथील पी.डी. डेव्हलपर्स कार्यालयात किंवा विनायक रांजणकर (मो. ७२७६०२६८८४) यांच्याकडे नोंदवावीत. तसेच स्पर्धेच्या दिवशी सकाळी ६ ते ७ या वेळेतही नावनोंदणीची सुविधा उपलब्ध असेल.

शिरवलीत लोकसहभागातून बंधाऱ्याची उभारणी

। खोपोली । प्रतिनिधी ।

पावसाळ्यात डोंगरदऱ्यांतून वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा भविष्यासाठी विनियोग करण्याच्या उद्देशाने खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत शिरवलीने जलसंवर्धनाचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. महेश पाटील यांच्या पुढाकारातून ग्रामपंचायत आणि वनपरिक्षेत्र कार्यालय खालापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ढेबे बर्गेवाडी येथे वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. विशेष म्हणजे या कामासाठी ग्रामस्थांनी श्रमदानातून योगदान दिल्याने लोकसहभागातून जलसंवर्धनाचा आदर्श निर्माण झाला आहे.

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडूनही पाण्याचे योग्य नियोजन न झाल्याने उन्हाळ्यात अनेक गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. डोंगराळ भागातून वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संवर्धन करणे, ही काळाची गरज बनली आहे. हीच बाब लक्षात घेऊन सरपंच महेश पाटील यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वनविभागाच्या सहकार्याने वनराई बंधारा उभारण्याचा निर्णय घेतला.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. वनराई बंधाऱ्यामुळे पावसाळ्यात वाहून जाणाऱ्या पाण्याला अडथळा निर्माण होऊन त्याचा जमिनीत निचरा होण्यास मदत होणार आहे. परिणामी परिसरातील भूजलपातळी सुधारण्यास आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास हातभार लागू शकतो.

यावेळी सरपंच महेश पाटील, तंटामुक्त समिती अध्यक्ष विलास पाटील, सामाजिक कार्यकर्ते अंकुश कदम, रघुनाथ ढेबे, संपत ढेबे, बाबू ढेबे, सचिन ढेबे, वनपाल रघुनाथ कोकाटे, संजयकुमार लोखंडे, वनरक्षक राणी पाटील, संतोषी बास्टेवाड यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

ऐतिहासिक वारशाचे जतन करण्याचा प्रेरणादायी संदेश | **शारदा मंदिर स्कूलमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम**

विद्यार्थ्यांनी साकारल्या गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती

। कर्जत । प्रतिनिधी ।

दीपावली सणाचे औचित्य साधून शारदा मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, कर्जत येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि ऐतिहासिक वारशाची जाणीव करून देणारा किल्लेनिर्मितीचा नाविन्यपूर्ण उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. बुधवारी (दि.४) नोव्हेंबर रोजी आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून शिवकालीन गड-किल्ल्यांच्या आकर्षक



प्रतिकृती साकारत इतिहासाला जणू जिवंत रूप दिले.

दीपावलीनिमित्त शाळेत आकाश कंदीलनिर्मिती, शुभेच्छापत्र तयार करणे, पणत्या रंगविणे, रांगोळी काढणे, चित्रकला आदी विविध उपक्रमांचे इयत्तानिहाय आयोजन करण्यात आले होते. छाया नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रतापगड, रायगड, सिंहगड, शिवनेरी, तोरणा, सिंधुदुर्ग, राजगड आदी किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार केल्या. या उपक्रमासाठी नेहा कदम, हेमलता दगडे, शबनम मिर्झा, स्मिता पुरोहित, अस्मिता जाधव, दीपिका बडगुजर, रूपाली निलधे, शाल्मली लेले यांनी विशेष सहभाग घेतला होता.

पर्यावरणपूरक साहित्याचा वापर

या उपक्रमात दगड, विटा, माती, कागद, कापड व रंग अशा पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यात आला. प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहासांचे महत्त्व आणि ऐतिहासिक वारसा विद्यार्थ्यांपर्यंत प्रत्यक्ष कृतीतून पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू होता.परीक्षेचा कालावधी असूनही विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर शाळेत उपस्थित राहून अत्यंत उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने हा उपक्रम पूर्ण केला. विद्यार्थ्यांच्या या कलात्मक प्रयत्नांना पालकांचे अप्रत्यक्ष सहकार्यही लाभले.



जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवले साबण

। नेरळ । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद शाळा खाड्याचा पाडा येथील विद्यार्थी यांनी आपले शिक्षक संतोष नाटीकर यांच्या माध्यमातून साबण बनवण्याचे प्रशिक्षण घेतले आणि साबण बनवले देखील. विद्यार्थ्यांच्या यॉ कलागुणांचे कौतुक होत असून याच शाळेचे विद्यार्थ्यांनी काही दिवसांपूर्वी यू ट्यूबवर डॉक्युमेंट्री बनवली होती.

रायगड जिल्हा परिषद शाळा खाड्याचा पाडा येथे शिक्षक संतोष नाटिकर यांच्या माध्यमातून साबण बनवणे कार्यशाळा घेण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षणासोबतच हाताने काम करून शिकण्याची आणि व्यवसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी देण्यासाठी शिक्षक संतोष देवेंद्र नाटीकर यांच्या कडून हा प्रयत्न सुरू आहे.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सोपबेसचे तुकडे करून ते वितळवले, त्यात अलोवेरा पल्प, कडुलिंबाची पाने आणि तुळशीची पाने मिसळली आणि साच्यांत ओतून हिरव्या रंगाचे गोल साबण तयार केले. वितळवणे आणि गरम मिश्रण हाताळणे ही कामे शिक्षकांनी केली, तर पाने धुणे, वाटणे, मिश्रण तयार करणे आणि साच्यात भरणे यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. साबण तयार झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी तो स्वतः वापरून पाहिला आणि बाजारात मिळणाऱ्या साबणांशी त्याची तुलना केली. किंमत, घटक, सुगंध आणि वापराची सोय हे मुद्दे त्यांनी पडताळले. बाजारातील साबणाची किंमत, जाहिरात व पॅकिंगचा खर्च आणि स्वतः बनवलेल्या साबणाचा कमी खर्च यातील फरक मुलांना प्रत्यक्ष गणित मांडून समजला. त्यातून बचत, खर्च आणि नफा या संकल्पना त्यांना सहज उमगल्या.

> **सामान्यता कार्यानुभव विषयांतर्गत आकाश कंदील, पणत्या बनवणे असे उपक्रम बनवले जातात.रायगड जिल्हा परिषद शाळा खाड्याचापाडा येथे विध्यार्थ्यांना साबण बनवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.दैनंदिन जीवनात वापरली जाणारी वस्तू साबण आणि तिचा बाजारभाव आधी मुलांना सांगितला आणि हा उपक्रम विद्यार्थ्यांनी यशस्वी केला.**
> **संतोष नाटीकर**

डोक्यावर दगडाने केली मारहाण

। पनवेल । प्रतिनिधी ।

बोलण्याच्या वादाच्या रागातून डोक्यावर दगडाने मारहाण केल्याप्रकरणी ३५ वर्षीय अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात एक नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल रेड्डी चालक असून ते तळोजा फेस टू येथे राहतात. एक ऑक्टोबर रोजी रात्री एकच्या सुमारास आरटीओ ऑफिस तळोजा फेस टू या ठिकाणी फिर्यादी यांच्यासोबत कुणाल वाईन आणि डाईन या ठिकाणी बोलण्याच्या वादाच्या रागातून त्यांच्या डोक्यावर अनोळखी इसमाने दगडाने मारहाण केली आणि त्यांना जखमी केले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरुड-जंजिरा यांचे कार्यालय
दरबार रोडता. मुरुड-जंजिरा जि. रायगड पिन-४०२४०१
दुरध्वनी क्रमांक ०२१४४/२७४०२६, ईमेल- tahasilmurud@gmail.com.
क्र./टेनन्सी शाखा/कात २/३२ ग/दावा क्र. ०२/२०२५ दिनांक :- /२०२६

जाहीर नोटीस
३२ ग/दावा क्र.:- टेनन्सी शाखा/कात-२/०२/२०२५

१. श्रीम. महाली रामा काटकर
२. श्री. जानू रामा काटकर वादी
३. श्री. मधूकर रामा काटकर
सर्व रा.तळेखार ता.मुरुड जंजिरा जि.रायगड ४०२४०१

विरूद्ध

१. श्रीकांत भालचंद्र तेंडूलकर
२. शेखर भालचंद्र तेंडुलकर
३. प्रियंदा भालचंद्र तेंडूलकर प्रतिवादी
४. सई अविनाश असगेकर
५. सुलोचना माधव तेंडूलकर
६. निवेदिता सुरेश वाळिंबे
७. अरुणा हर्षद भिसे
८. संगिता माधव तेंडूलकर
सर्व रा. कोकबन शिलोशी ता. रोहा रायगड.

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे तळेखार ग.नं./स.नं. १०/३ ता. मुरुड, जि.रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक १८/०३/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. सामनेवाले श्रीकांत भालचंद्र तेंडूलकर व इतर हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक -/-/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय मुरुड, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीसीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण तथा तहसिलदार मुरुड-जंजिरा यांचे न्यायालयात समक्ष हजर राहून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

गावाचे नाव	ग.नं. हि.नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार
तळेखार	१०/३	०.२१.५०	०.७५

सदरची जाहीर नोटीस माझ्या सही शिक्यांनिशी दिली.

सही/-
(आदेश डफळ)
अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण
तथा तहसिलदार मुरुड-जंजिरा

पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.

दूरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०, ४१, ४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३२९
ईमेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/अ.बां.नि./३६३६/प्र.क्र.०३/२७०/२०२६ दिनांक : ५/११/२०२६

अधिसूचना

पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्र. ८५१९/२००६ चे प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करणे/ नियमित करणे / स्थलांतरित करणे या अनुषंगाने निर्देश तसेच महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीटीएम- ०९०९/प्र.क्र.५५८/ (भाग २)/ विशा-१ब, दि. ०५ मे २०११ चे अनुषंगाने, मी आयुक्त, जी अधिसूचना काढण्याचे योजित आहेत, त्या अधिसूचनेचा खालील मसुदा सर्व नागरिकांच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अधिसूचनेचा मसुदा

पनवेल महानगरपालिका हद्दीत सिडको प्राधिकरणाअंतर्गत विभागातील अनधिकृत धार्मिक स्थळांचे वर्गिकृत यादी त्याचे वर्गीकरणानुसार पुढील कार्यवाही अनुषगांने प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. क्र.	अनधिकृत बांधकाम /अतिक्रमण	अनधिकृत बांधकामांचा स्वरुप	ठिकाण	वर्गीकरण
१.	'संतोषी माता मंदीर	विटांचे बांधकाम व पत्राशेडचे	कळंबोली नोड, सेक्टर- ९, भुखंड क्र. ४ A	'ब' वर्गीकरण
२.	देवी आंबा माता मंदीर	पत्रा व जोत्याचे बांधकाम	पनवेल नोड, भुखंड क्र. ४३ सी, सेक्टर-१३	'ब' वर्गीकरण
३.	मशिद	विट व सिमेंट पत्र शेड बांधकाम	कामोठे नोड, भूखंड क्र. ३४, सेक्टर -६अ	'ब' वर्गीकरण
४.	संकट मोचन खांदेश्वर धाम	जागेत चारही बाजूने पत्रे विट व सिमेंट बांधकाम	कामोठे नोड सेक्टर २५ भूखंड क्रमांक २९	'ब' वर्गीकरण
५.	श्री.साई गणेश मंदीर	पत्राशेड व विट बांधकाम	खारघर नोडमधील सेक्टर १६, भुखंड क्र.३ब	'ब' वर्गीकरण
६.	शुभनशहा दर्गा	पत्राशेड व विट सिमेंट पक्के बांधकाम	पनवेल नोड मधील अ.भु.क्र. २१०	'अ' वर्गीकरण
७.	गौस पाक पीर	बांधकाम	पनवेल नोड मधील अ.भु.क्र २१७	'ब' वर्गीकरण
८.	हनुमान मंदीर	पक्के विटांचे बांधकाम व त्यावर लोखंडी पत्रा शेड	उपविभाग नावडे नोडमधील सर्वे नं.१० भुखंड क्रमांक NA४, सेक्टर ३६	'ब' वर्गीकरण
९.	शिव मंदीर	आर.सी.सी. व विटांचे बांधकाम	उपविभाग नावडे नोडमधील मौजे नावडे सेक्टर ४०, सर्व नंबर १५८/६	'ब' वर्गीकरण

उक्त प्रमाणे अतिक्रमण अनधिकृत बांधकाम/ धार्मिक स्थळ म्हणून नमूद असलेल्या विभागातील अनधिकृत धार्मिक स्थळांचे वर्गिकृत यादी त्याचे वर्गीकरणानुसार पुढील कार्यवाही अनुषगांने प्रसिद्ध करण्यात येत आहे. 'अ' वर्गिकरणातील नियमितीकरणास प्रस्तावित असलेली 'ब' वर्गीकरण असलेले नियमितीकरण करणे शक्य नसलेली व 'क' वर्गीकरण असलेले स्थलांतरण करणे प्राप्त असलेली धामिक स्थळे असून, त्याबाबत वर्गीकरण निहाय नियमितीकरण, निष्कासन व स्थलांतरणाची कारवाई प्रस्तावित करणेत येत आहे. अशा वर्गीकरणाबाबत कोणाला काही आक्षेप किंवा हरकत असल्यास ते त्यांनी उक्त अधिसूचना प्रसिद्ध झाले दिनांकपासून पुढील ३० दिवसाच्या कालावधीमध्ये पनवेल महानगरपालिका स्तरीय समितीकडे पनवेल महानगरपालिका कार्यालय येथे पुरावे/कागदपत्र यांसह सादर करावेत. तदनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेप/हरकती याबाबत विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सही/-
आयुक्त तथा अध्यक्ष
पनवेल महानगरपालिका स्तरीय अनधिकृत धार्मिक स्थळे समिती

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

कार्यालय : मु.वाशीवली, पो.पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड

जा.क्र. ३५९/२०२६ दिनांक : ०५/११/२०२६

निविदा सुचना

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ता. खालापूर जि. रायगड हद्दीत ग्रामनिधीअंतर्गत सन २०२६/२७ करिता खालीलप्रमाणे कामे मा. उपअभियंता (बांध) उपविभाग कर्जत व मा. कार्यकारीअभियंता (बांध) विभाग अलिबाग यांचेकडील मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक ठेकेदारांकडून टक्केवारी दराने आपली सीलबंद निविदा दिनांक ६/११/२०२६ ते १६/११/२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारणेत येतील.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फी	इसारा रक्कम	फंड	निविदा उघडण्याचा दिनांक
१)	मौजे : कैरे गणेशघाट दुरूस्ती करणे.	७,९९३३०/-	१००/-	७०००/-	ग्रामनिधी	१७/११/२०२६

अटी व शर्ती खालीलपमाणे :
१) सदर कामाबाबत सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल
२) निविदेसोबत इसारा रक्कम भरणा केल्याची पावती, आधारकार्ड, पॅनकार्ड, झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
३) मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
४) शासकीय नियमाप्रमाणे आयकर, वस्तु व सेवा कराचे (GST) रकमा कपात करणेत येतील
५) बिलाचे एकूण रकमेपैकी ५ टक्के रक्कम ही काम पूर्ण झाल्याच्या दिनांकापासुन बारा महिने कालावधीसाठी सुरक्षा अनामत म्हणून कपात करणेत येईल.
६) निविदेत सादर केलेले दर हे जी. एस. टी सहीत असावेत.
७) कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार तसेच निविदा सुचनेत बदल करणेचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत वडगांवने राखुन ठेवलेला आहे.
८) अंदाजपत्रकात ठरवून दिलेल्या तपशीलाप्रमाणे साहित्य वापर करणे बंधनकारक राहील.
९) काही अपरिहार्य कारणास्तव बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास या कार्यालयास कोणताही दावा करता येणार नाही.
१०) पुर्ण करणेत आलेल्या कामाची किमान एकवर्ष विनामुल्य देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील
११) अटी व शर्तीचा करारनामा रू.५००/- स्टँप पेपरवर करून द्यावा लागेल.

श्री. सुहास विष्णु वारे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

श्री. विनोद चांदोरकर
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** उपमुख्य अभियंता/कार्य/रत्नागिरी विभागांतर्गत खेड, चिपळूण, सवर्डा, विलवडे, राजापूर आणि वैभववाडी येथील स्थानक इमारतींचे रंगकाम तसेच कोलाड, वीर, करंजाडी आणि निवसर स्थानकांवरील पादचारी उड्डाणपुलांचे (एफओबी) रंगकाम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन डिव्हायसीईडब्ल्यूपेंट-30-2026 तारीख: 05/11/2026 एकूण अंदाजित खर्च:** ₹53,32,592.44 /- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 13/11/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 27/11/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 4 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील क्षेत्र विकास योजना नं. ३ (चेंढरे), अलिबाग नगरपरिषद हद्दीतील प्लॉट नं. सी ११ व सी १२ यावरील ''अशोका प्रिमायसेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या'' श्रीबाग नं ३ अलिबाग या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील ऑफिस युनिट नं. १ क्षेत्र १४८० चौ. फुट कारपेट, या मिळकतीपैकी क्षेत्र ४३० चौ. मीटर कारपेट, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000000888 जुना मालमत्ता क्र. Z1STS000890 मॅन्युअल मालमत्ता क्रमांक ६५० आणि सहकारी संस्थेमधील हक्कभाग हे ऑफिस युनिट, या ऑफिस युनिटचे विद्यमान मालक आशा वैभव गोसावी रा. बी/७ लक्ष्मी श्रीनिवास को. ऑप. हौ. सोसायटी ठिकरूळनाका, ता. अलिबाग यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू ऑफिस युनिट निर्वेध असल्याचा भरवसा ऑफिस युनिटचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू ऑफिस युनिट वर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास ऑफिस युनिट निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : ०५/११/२०२६ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. डोंगरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक १) श्री. इंद्र कुमार २) श्री. अशोक नवलकुमार ठकेरिया यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर. पॉ.)	आकार
२	७	०-४२-००	०-४८

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/११/२०२६
ॲड. सिध्देश शंकर साखरे
ऑफीस : १०१/१, वसंत पॅराडाइस,
१ ला मजला, कोतवाल नगर,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८९८३४८१५६७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक विनायक विठोबा पाटील व मंजिरी पराग शेळके यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
आंबेपूर ता.अलिबाग	७४	०-४५-८० पो.ख ०-०२-०० एकुण ०-४७-८०	४.८७

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी विनायक विठोबा पाटील व मंजिरी पराग शेळके यांच्या हिश्याचे एकुण क्षेत्र ०-०२-०० हे.आर. आकार ०.२१ रु.पै ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
ॲड. मानस सुधाकर पाटील
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ७७४३८०९६५३

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक (१) मिलिंद मनोहर माने, (२) पुजा गोपिचंद पाटील, (३) रोहिणी राजेश पाटील व (४) महेश मनोहर माने यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित बाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरुपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अनुसूची
(मिळकतीचे वर्णन)

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे नांदईपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेल्या गट क्रमांक २६६/१/अ, एकूण क्षेत्रफळ ००.७३.१० हे.आर.चौ.मी. (लागवडीयोग्य क्षेत्र ००.६४.०० हे.आर.चौ.मी. व पोटखराब क्षेत्र ००.०९.१० हे.आर.चौ.मी.), आकारणी रु. १३.६१, या शेतजमिनीपैकी ००.१६.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्राचा अविभक्त हिस्सा, त्यासंबंधीच्या सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह,

ठिकाण : मुंबई
दिनांक ६ नोव्हेंबर २०२६

क्वाड्रा लीगल करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव
(+९१ ९८३३६२५१९५)

जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, रहिवासी, पर्यावरणासंबंधी ग्रुप्स आणि इतर सर्व संबंधीत व्यक्तींना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण विभागाने मे.न्युजेन बिल्डर्स यांच्या मौजे-चेंढरे तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथील गट क्र.३०/२, ३०/१, २४/१/ब/१ आणि २४/१/ब/३ या भूखंडावर प्रस्तावित निवासी आणि व्यावसायिक इमारत संकुलास पर्यावरणीय मंजुरी प्रदान केली आहे. सदर पर्यावरणीय मंजुरी पत्र क्र.EC26C3801MH5713937N आणि फाइल क्र.SIA/MH/INFRA2/590985/2026 दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ द्वारे परवानगी दिली आहे व (दिनांक) रोजी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर मंजुरी पत्र पर्यावरण विभाग, परिवेश (PARIVESH - Pro-Active and Responsive Facilitation by Interactive, Virtuous and Environmental Single Window Hub) या संकेतस्थळावर https://parivesh.nic.in/#/ येथे उपलब्ध आहे.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक यांच्यामध्ये साठेकरार करण्यात आलेला आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर	आकार रू.पैसे	मालकाचे नावे
भोनंग, ता. अलिबाग,	१२१	०-३६-७० पो.ख.०-००-८० एकुण क्षेत्र ०-३७-५०	३.३८	श्री. वैभव पांडुरंग पाटील

संदर्भित मिळकत पुर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०६/११/२०२६ **ॲड. अश्विनी अ. म्हात्रे**
बी.कॉम.एल.एल.बी.
००१, वैद्यबाग को. ऑप
हौ. सो. कामत आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन
मौजे उकुळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार	
			हे.आर.चौ.मी	रुपये	पैसे
नंदकुमार श्यामकुमार पोतदार व इतर	८३	२/अ/१	०-१९-००	२	४४

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं.४, पहीला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
ॲड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक : ०६/११/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकानी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती सं

अप्सरा हॉटेलवर कारवाईचा बडगा

|| नगरपरिषदेकडून कागदपत्रे सादर करण्याची नोटीस || नियमबाह्य बांधकाम आढळल्यास बंद करणार

| महाड | प्रतिनिधी |

महाड शहरातील अप्सरा हॉटेलच्या इमारतीच्या बांधकामाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेत महाड नगरपरिषदेने संबंधितांना नोटीस बजावली आहे. बांधकामाची वैधता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रे १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, नियमबाह्य बांधकाम आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही नगरपरिषदेने



दिला आहे.

महाड येथील सर्व्हे क्रमांक २३२२ मधील मालमत्तेवर नवीन, पक्के अथवा कच्चे बांधकाम करण्यात आले असल्याची माहिती नगरपरिषदेला प्राप्त झाली आहे. त्यामुळे याठिकाणी असलेल्या अप्सरा हॉटेलच्या इमारतीच्या बांधकामाबाबत महाड नगरपरिषदेने आता कडक भूमिका घेतली आहे. महाड शहरातील या इमारतीमध्ये नवीन अथवा पक्के बांधकाम करण्यात आले असल्याबाबत, तसेच संबंधित बांधकामाची वैधता तपासण्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषदेने संबंधितांना अधिकृत नोटीस बजावली आहे.

महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडून दि.२६ ऑक्टोबर रोजी ही नोटीस जारी करण्यात आली आहे. या बांधकामाची वैधता तपासण्यासाठी नगरपरिषदेने संबंधितांकडे १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. त्यामध्ये नगरपरिषदेची बांधकाम परवानगी किंवा ना-हरकत दाखला, भोगवटा प्रमाणपत्र व मंजूर बांधकाम नकाशा, प्रॉपर्टी कार्ड अथवा ७/१२ उतारा, सिटी सर्व्हेचा नकाशा तसेच महसूल खात्याचे विनंती आदेश व नकाशा इत्यादी कागदपत्रांचा समावेश आहे. निर्धारित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास किंवा बांधकाम नियमबाह्य असल्याचे आढळल्यास संबंधित बांधकाम बंद करून ते काढून टाकण्याची कारवाई केली जाऊ शकते. तसेच, कायद्यानुसार पुढील कारवाई करून त्याचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल, असा इशाराही नगरपरिषदेने दिला आहे.

त्यामुळे अप्सरा हॉटेलच्या बांधकामाबाबत नगरपरिषद आता नेमकी कोणती भूमिका घेते, संबंधितांकडून आवश्यक कागदपत्रे सादर होतात का आणि बांधकामाच्या प्रत्यक्ष तपासणीत काय निष्पन्न होते, याकडे महाडकरांचे लक्ष लागले आहे.

निवडक

महाडमध्ये ४० लाखांची फसवणूक

महाड : स्वतःच्या मालकीच्या गाड्या कंपनीमध्ये भाडेतत्त्वावर लावून त्याबदल्यात आकर्षक मोबदला मिळवून देण्याचे आमिष दाखवत महाडमधील एका तरुणाची सुमारे ४० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, महाड येथील आदेश शहा (२२) यांचा विश्वास संपादन करून सादिक मनजागणकर आणि मेहुल जगदाळे यांनी शहा यांच्या मालकीच्या गाड्या कंपनीमध्ये लावून त्यातून नियमित उत्पन्न मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर गाड्या ताब्यात घेऊन ठरल्याप्रमाणे मोबदला न देता तसेच गाड्या परत न करता फसवणूक केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणात सुमारे ४० लाख रुपये किमतीची टोयोटा इनोव्हा क्रिस्टा गाडी अपहारित झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

पसार झालेल्या वाहनचालकावर गुन्हा

नेरळ : कर्जत तालुक्यातील सावळे फाटा येथे लाखाची वाडी येथील तरुणाच्या दुचाकीला धडक देऊन कारचालक पळून गेला होता. त्यात दुचाकी चालकाचा मृत्यू झाला. त्यानंतर कर्जत पोलिसांनी अपघातानंतर पळून गेलेल्या कार चालकाला पकडून आणले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाखाची वाडी येथील अनंता वाघमारे हे मंगळवारी (दि.३) आपल्या दुचाकीवरून घरी जात होते. ते सावळा फाटा येथे आले असता, त्यांच्या पाठीमागून आलेल्या कारचालकाने त्यांना धडक दिली. या धडकेत अनंता वाघमारे यांचा मृत्यू झाला. त्यानंतर कारचालक तेथून पसार झाला होता. कर्जत पोलिसांनी सीसीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने कारचालकाचा शोध घेण्यात आला. त्यानंतर या कारचालकाला अंबरनाथ येथून पकडण्यात आले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अलिबागेतील रामधरणेश्वर डोंगरावर आग



सोगाव : अलिबाग तालुक्यातील रामधरणेश्वर डोंगराच्या सोगाव भागातील खालच्या बाजूला मंगळवारी (दि.३) दुपारच्या वेळी आग लागल्याची घटना घडली. ही आग समाजकंटकांकडून लावण्यात आली असून, त्यात मोठ्या प्रमाणात वनसंपत्ती जळून खाक झाली. याबाबत सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांना माहिती मिळताच त्यांनी सहकाऱ्यांसह शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. गेल्या काही महिन्यांपासून अलिबाग तालुक्यात पावसाने दडी मारल्यामुळे दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे वातावरणात कमालीची उष्णता वाढली आहे. अशातच मंगळवारी रामधरणेश्वर डोंगर भागात समाजकंटकांकडून आग लावण्याची घटना घडल्यामुळे उष्णतेत कमालीची वाढ होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, या वणव्यात डोंगरावर असणाऱ्या पशु-पक्षांचा नैसर्गिक अधिवास आणि खाद्य जळून मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्यामुळे डोंगरावरील बिबट्या, तरस, रानडुकरे, माकडे, सरपणारे प्राणी आदी जंगली प्राणी मानवी वस्तीकडे येऊन अधिकच धोका निर्माण होण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविली जात आहे. दरम्यान, यापुढे वनविभागाने वणवा लावणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन कठोरात कठोर कारवाई करावी, तसेच वनविभागाने वनकर्मचारी यांच्यामार्फत डोंगर भागात गस्त वाढवून पर्यावरण वाचविण्यासाठी कडक पाऊले उचलण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी वनविभागाकडे केली आहे.

'रिक्षाचालकांना विश्वासात घ्या'

पनवेल : पनवेल महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरू करण्याच्या हालचाली सुरू असताना स्थानिक रिक्षाचालकांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. परिवहन सेवा सुरू करताना स्थानिक रिक्षाचालकांच्या व्यवसायावर कोणताही परिणाम होऊ नये आणि त्यांच्या अडचणींचा विचार करून निर्णय घ्यावा, या मागणीसाठी सागर पाटील यांनी पनवेल महानगरपालिकेच्या महापौर आणि उपायुक्तांची भेट घेऊन चर्चा केली. या चर्चेदरम्यान स्थानिक रिक्षाचालकांना विश्वासात घेऊनच परिवहन सेवेसंदर्भात योग्य निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. यावर महापौर आणि उपायुक्तांनी रिक्षाचालकांशी चर्चा करून तसेच त्यांच्याशी समन्वय साधूनच पुढील निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.





● चिमुकल्यांनी दिवाळीच्या सुट्टीचा अनोखा उपयोग करत दगड, मातीच्या सहाय्याने शिवकालीन गड-किल्ल्यांची आकर्षक प्रतिकृती उभारली. (छायाचित्र: नरेंद्र सोनार)

नूतन विभाग कमिटी स्थापन

| खांब | प्रतिनिधी |

कोलाड विभाग बौद्ध समाज व बहुजन समाज नूतन विभाग कमिटी स्थापन करण्यात आली असून, अध्यक्षपदी प्रविणमोरे यांची निवड करण्यात आली आहे. तर, उपाध्यक्षपदी सुरेंद्र साळुंके, सचिवपदी नामदेव गायकवाड, सुमीत गायकवाड, खजिनदारपदी कुणाल गायकवाड, तसेच सल्लागार म्हणून सिद्धार्थ गायकवाड, नरेश गायकवाड, सुरेश गायकवाड, अनंत घाडगे, हिरामण मोते, रमेश गायकवाड, बापू भंडारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी संतोष



कांबळे, चंद्रशेखर कांबळे, निळकंठ घाडगे, विश्वनाथ जाधव, विलास कांबळे, प्रदीप वाघमारे, नरेश गायकवाड, कुणाल गायकवाड, सुमीत गायकवाड, प्रविण गायकवाड, हिरामण मोते, विजय शिंदे, नामदेव गायकवाड, अनिल ओव्हाळ, बापू भंडारी, अनंत घाडगे, सुरेंद्र साळुंके, रमेश गायकवाड, प्रमोद जाधव आदी उपस्थित होते.

रणरणत्या उन्हात शेतकऱ्यांची कसब

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यात सध्या भात कापणीचा हंगाम जोरात सुरू असून, रणरणत्या उन्हात शेतकरी आणि शेतमजूर शेतात राबताना दिसत आहेत. दिवसभर उन्हाचा वाढता तडाखा सहन करणे कठीण होत असल्याने भात कापणीसाठी सकाळ आणि सायंकाळची वेळ निवडली जात आहे. तर, दुपारच्या वेळी भात झोडणीसाठी शेताच्या बांधावरील वृक्षांच्या सावलीचा आधार घेतला जात आहे. पूर्वी शेताच्या बांधावर मोठ्या प्रमाणात वृक्ष असल्याने कडक उन्हातही शेतकरी आणि शेतमजुरांना सावलीचा मोठा आधार मिळत होता. मात्र, कालांतराने बांधावरील वृक्षांची संख्या कमी झाल्याने आता सावलीही दुर्मिळ झाली आहे.

साळाव-मुरूड रस्त्यावरील प्रवास खडतर

| कोर्लई | प्रतिनिधी |

राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्यावरील काँक्रिटिकरणात रस्त्यावरील दोन्ही बाजूंनी खोदाई करण्यात आली आहे. या खोदाईमुळे आणि महिनोमहिने काही ठिकाणी अपूर्ण ठेवलेल्या कामांमुळे वाहनचालकांसह प्रवासी वर्गाची डोकेदुखी वाढली आहे. आता दीपावलीच्या सणाला सुरुवात झाली असून, पर्यटनाचा नवा हंगाम देखील सुरू झाला आहे. त्यामुळे मुंबई, पुणेसह अन्य ठिकाणाहून पर्यटक साळाव-मुरूड मार्गे जंजिरा किल्ला व काशीद समुद्रकिनाऱ्यावर दाखल होत आहेत.

मात्र, या रस्त्याच्या काँक्रिटिकरणात काशिद रस्त्यावरील यू टर्न, काशिद, चिकणी, सर्वे, दांडा, नांदगाव, आयुष हॉस्पिटल, मजगांव, विहर भागात दोन्ही बाजूंना सुरू असलेली खोदाई आणि काही ठिकाणी पसरलेल्या खडीमुळे पर्यटकांसह स्थानिकांचा प्रवास खडतर झाला आहे. वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे. त्यामुळे राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळ संबंधित अधिकारी व प्रशासन तसेच आपत्ती व्यवस्थापनाने याची दखल घेऊन योग्य ती काळजी घ्यावी, अशी



मागणी वाहनचालकांसह प्रवासीवर्ग व ग्रामस्थांतून केली जात आहे.

विद्यार्थ्यांना फटाकेमुक्त दिवाळीची शपथ



| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

वाघोशी येथील रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळेत दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण स्नेही फटाकेमुक्त दिवाळी शपथ कार्यक्रम उत्साहात पार पडला. शाळेच्या प्रांगणात मुख्याध्यापक राजेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकवृंद जनार्दन भिलारे, किर्ती लामदाडे, सुवर्णा घोडे तसेच सर्व विद्यार्थ्यांनी हातात फलक धरून फटाके न फोडण्याची, पर्यावरण रक्षण व्हावे म्हणून झाडे लावून संवर्धन करण्याची, तसेच पाण्याचा जपून वापर करण्याचीही शपथ घेतली. फटाके फोडल्याने मोठ्या प्रमाणावर हवेचे आणि ध्वनीचे प्रदूषण होते. हे प्रदूषण थांबावे यासाठी हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, वरिष्ठ विस्तार अधिकारी नवनाथ साबळे, केंद्रप्रमुख अनिल राणे, शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग, ग्रामस्थ यांनी कौतुक केले.

माथेरान शहर वीज संपन्न

कमी दाबाचा प्रश्न मिटला; तीन नवीन रोहित्र बसवले

| नेरळ | प्रतिनिधी |

पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानमध्ये कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने शहरातील हॉटेल व्यावसायिक आणि बाजारपेठेतील दुकानदार त्रस्त होते. दरम्यान, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या प्रयत्नांतून तीन नवीन वीज रोहित्र माथेरानसाठी मंजूर झाली होती. आता ही सर्व रोहित्र माथेरान शहारत बसवून कार्यान्वित करण्यात आली असून, शहरातील विजेचा प्रश्न मार्गी लागला आहे.

माथेरानमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून विजेचा प्रश्न नागरिकांना आणि व्यावसायिकांना चांगलाच सतावत होता. कधी कमी दाब, तर कधी अचानक वीज गायब. त्यात विजेचा वाढत्या भारामुळे



नागरिकांसह व्यापारीही अक्षरशः हैराण झाले होते. या समस्येबाबत नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्याकडे सातत्याने तक्रारी येत होत्या. अखेर त्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून महावितरणकडे पाठपुरावा केला होता. शहरातील श्रीराम चौकातील डीपीवर यापूर्वी २०० केव्ही क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर होता. मात्र, त्यावर क्षमतेपेक्षा जास्त भार येत असल्याने मुख्य बाजारपेठेत कमी दाबाने वीजपुरवठा होत होता. वारंवार फ्यूज उडणे आणि वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकारही घडत होते. ही समस्या दूर करण्यासाठी आता त्याच ठिकाणी अतिरिक्त १०० केव्हीचा ट्रान्सफॉर्मर बसवून ६५० मीटरची नवीन केबल टाकून दोनस्वतंत्र सर्किट तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे विजेच्या भाराचे विभाजन होऊन मुख्य बाजारपेठेतील वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. या कामासाठी पनवेल विभागाचे कार्यकारी अभियंता दिवाकर देशमुख यांचे सहकार्य लाभले असून महावितरणचे उप अभियंता मोतीराम राख, सहाय्यक अभियंता बजरंग उंबरकर यांनी माथेरानमध्ये ते नवीन वीज रोहित्र आणून बसवून घेतले आहेत.

बचत गटांना हक्काची बाजारपेठ

| म्हसळा | प्रतिनिधी |

दिवाळीच्यापार्श्वभूमीवरमहिला बचतगटांनीतयारकेलेल्याउत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळावी आणि महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळ मिळावे, या उद्देशाने उमेद अभियानाच्या माध्यमातून म्हसळा बसस्थानकाजवळ आकर्षक दिवाळी विक्री स्टॉल उभारण्यात आले आहेत. या उपक्रमात श्री म्हसोबा गट घोणसे, श्री समर्थ गट टोंडसुरे, सखी महिला उत्पादक गट देवघर, फिजा गट वारळ, महालक्ष्मी गट काळसुरी, भाग्यलक्ष्मी गट काळसुरी आणि सोमजाई माता गट खरसई या महिला बचत गटांनी स्टॉल लावले आहेत. या स्टॉलवर महिला बचत गटांनी तयार केलेला पारंपरिक दिवाळी फराळ, विविध प्रकारच्या मिठाई, गृहउपयोगी वस्तू, आकर्षक पणत्या इत्यादी वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यावेळी पंचायत समितीचे सभापती बबन मनवे, जि.प. सदस्य अभिषेक विचारे, अनिल बसवत, लहू म्हात्रे, महेश घोले, गटविकास अधिकारी मंगेश साळी, रोहिणी निळेकर यांच्यासह प्रभाग समन्वयक, ग्रामसखी, प्रभाग संघ व ग्रामसंघ पदाधिकारी आणि महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती होती.



चिमुकल्यांनी उभारला शिवकालीन किल्ला | मोबाईल बाजूला ठेवून शिवइतिहासाचा जागर

मातीतून शिवरायांच्या पराक्रमाला उजाळा

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |

आजच्या डिजिटल युगात मोबाईल हा लहान मुलांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनत चालला आहे. सुट्टी मिळाली की मैदानी खेळांपेक्षा मोबाईल गेम्स, चित्रफिती आणि आभासी जगात रमणारी बालपिढी पाहायला मिळते. मात्र, या आकर्षणाला बाजूला सारत रेवदंड्यातील काही चिमुकल्यांनी दिवाळीच्या सुट्टीचा अनोखा उपयोग केला आहे. हातात मोबाईल घेण्याऐवजी माती, दगड आणि परिसरातील उपलब्ध साहित्याच्या मदतीने त्यांनी शिवकालीन गड-किल्ल्यांची आकर्षक प्रतिकृती उभारली. त्यांच्या या छोट्याशा उपक्रमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा, स्वराज्याच्या इतिहासाचा आणि महाराष्ट्राच्या दुर्गसंस्कृतीचा जणू



जागरच घडला असून, या बालगोपाळांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दिवाळीची सुट्टी म्हटली की मुलांसाठी आनंद, खेळ आणि धमाल असते. मात्र, या सुट्टीचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी न करता काहीतरी वेगळे आणि प्रेरणादायी निर्माण करता येते, हे रेवदंड्यातील चिमुकल्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. आज अनेक मुले तासन्तास मोबाईलच्या पडद्यावर वेळ घालवतात. त्याच वयातील या मुलांनी मात्र मातीशी नाते जोडत दगड गोळा केले आणि आपल्या कल्पकतेला मेहनतीची जोड देत किल्ल्याची उभारणी केली. त्यांच्या या उपक्रमातून बालपणातील सर्जनशीलता आणि एकत्रितपणे काहीतरी घडविण्याचा आनंद अनुभवायला मिळत आहे.

महाराष्ट्राच्या मातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा आणि स्वराज्य स्थापनेच्या संघर्षाचा गौरवशाली इतिहास लाभला आहे. सह्याद्रीच्या कुशीत उभे असलेले गड-किल्ले म्हणजे केवळ दगड-मातीच्या वास्तू नसून स्वाभिमान, शौर्य, दूरदृष्टी, नियोजन आणि स्वराज्याच्या अस्मितेची जिवंत प्रतीके आहेत. हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा आणि मुलांच्या मनात शिवरायांविषयी अभिमान निर्माण व्हावा, यासाठी दिवाळीत किल्ले उभारण्याची परंपरा आजही महत्त्वपूर्ण ठरत आहे. या किल्ल्याच्या निर्मितीसाठी मुलांनी माती, लहान दगड, विटांचे तुकडे आणि रंगांचा कल्पकतेने वापर केला. किल्ल्याची तटबंदी, प्रवेशद्वार, बुरुज, पायऱ्या आणि भगवे ध्वज यांची केलेली आकर्षक मांडणी लक्ष वेधून घेत आहे. किल्ल्याचा प्रत्येक भाग उभारताना मुलांनी दाखवलेली कल्पकता, मेहनत आणि एकमेकांना दिलेली साथ त्यांच्या सांघिक भावनेची साक्ष देत आहे. छोट्याशा जागेत ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे वैभव उभे करण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.विशेष म्हणजे, हा उपक्रम केवळ दिवाळीतील करमणूक नसून मुलांसाठी संस्कारांची शिदोरी ठरत आहे.

पार्किंग भूखंडाबाबत रिक्षा संघटना आक्रमक

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमध्ये वाहनांना बंदी असल्यामुळे दस्तुरी येथील वाहनतळावर वाहने उभी करावी लागतात. मात्र, येथील वन विभागाचे वाहनतळ अपुरे पडत असल्याने शासनाने एक भूखंड वाहनतळ उभारण्यासाठी दिला आहे. मात्र, त्या वाहनतळावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे ते अतिक्रमण तत्काळ हटवण्यात यावे, अशी मागणी श्रमिक रिक्षा संघटनेने केली आहे.

माथेरानमध्ये दरवर्षी लाखोंच्या संख्येने पर्यटक येत असतात. या पर्यटकांच्या वाहनांसाठी दस्तुरी येथे वाहनतळ आहे. शहरात वाहनांना बंदी असल्याने तेथेच वाहने उभी करावी लागतात. मात्र, पर्यटन हंगामात हे वाहनतळ पुर्णपणे भरत असल्यामुळे पर्यटकांना ताटकळत रहावे लागते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने याच वाहनतळ जवळील एमपी प्लॉट ९३ हा भूखंड वाहनतळ उभारण्यासाठी माथेरान नगरपरिषदेला दिला आहे. मात्र, या भूखंडावर मोठ्या प्रमाणात घोड्यांचे तबेले असल्याने ते अतिक्रमण काढण्यात यावेत, अशी मागणी माथेरान मधील श्रमिक रिक्षा संघटनेने केली आहे.



राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाची कामं रेंगाळतील. ठरलेल्या भेटी लांबणीवर पडतील. आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं.
- **वृषभ** : नव्या संकल्पनांना वाव मिळेल. रखडलेली येणी सहज वसूल होतील. प्रवास लाभदायक राहील.
- **मिथुन** : वाढत्या जबाबदाऱ्यांचा ताण घेऊ नका. उत्साह, धडाडी टिकवून ठेवावी. कौटुंबिक सुख लाभेल.
- **कर्क** : भलत्या आश्वासनांना आवर घाला. सार्वजनिक क्षेत्रात विचारानं रहावं. महत्त्वाच्या भेटी होतील.
- **सिंह** : आवडत्या छंदामुळे समाधान लाभेल. सांस्कृतिक क्षेत्रात संधी लाभतील. जुनी येणी वसूल होतील.
- **कन्या** : कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. जुन्या ओळखी कामी येतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **तूळ** : सांधेदुखीचे विकार त्रासदायक ठरतील. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृश्चिक** : मनाजोग्या घटना घडतील. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल. कौटुंबिक सुख-समाधान लाभेल.
- **धनु** : अपेक्षित ध्येय प्राप्त करू शकाल. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल. प्रेम प्रकरणात विचार करावा.
- **मकर** : रखडलेली कामं मार्गी लागतील. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. कौटुंबिक पर्यटनाचा बेत आखाल.
- **कुंभ** : साऱ्या गोष्टी मनाजोग्या होतील. व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **मीन** : अपेक्षित कामं वेळेत होतील. नव्या कल्पनांना वाव मिळेल. उपजत कला-गुणांचा विकास होईल.

रसगंध

मस्त गोबी मांचुरियन

हॉटेलच्या मेन्यू कार्डमध्ये गोबी मंचुरियन हा पदार्थ असतो. हा पदार्थ तुम्ही घरीही बनवू शकता.

साहित्य: एक फ्लॉवर, अर्धा कप मैदा, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, कांदा, सिमला मिरची, तेल, पाणी.

सॉससाठी: अर्धा कप पाण्यात दोन चमचे कॉर्नफ्लोर मिसळून घ्या. अर्धा कप टोमॅटो प्युरी, सोया सॉस, मीठ आणि पाणी

कृती: फ्लॉवरचे मोठे तुकडे करून घ्या. कांदा, सिमला मिरचीचे लांब काप करा. आता मैद्यात आलं आणि लसूण पेस्ट घालून मिसळून घ्या. त्यात फ्लॉवरचे तुकडे घाला. सगळ्या तुकड्यांना मैदा नीट लागायला हवा. आता कढईत तेल गरम करा. फ्लॉवरचे तुकडे सोनेरी रंगाचे होईपर्यंत तळून घ्या. आता कढईतलं जास्तीचं तेल काढून ठेवा. उरलेल्या तेलात थोडी आलं-लसूण पेस्ट घाला. त्यात कांदा घालून परता. मग सिमला मिरची घाला. सॉससाठीचं सर्व साहित्य एका भांड्यात एकत्र करा. आता हे साहित्य कढईत घाला. आता कढईतलं मिश्रण घट्ट होऊ लागेल. यात फ्लॉवरचे तुकडे घालून मिसळून घ्या. गरमागरम खा.

६ नोव्हेंबर

दिनविशेष

- १९१३ : दक्षिण आफ्रिकेत भारतीय वंशाच्या खाणकामगारांच्या मोर्चाचे नेतृत्व केल्याबद्दल महात्मा गांधींना अटक.
- १९८५ : कोलंबियातील दहशतवाद्यांनी सर्वोच्च न्यायालयाची इमारत काबीज करून ११ न्यायाधीशांसह ११५ व्यक्तींना ठार मारलं.
- १९८७ : ज्येष्ठ लेखक, नाट्यअभिनेते भालबा केळकर यांचे निधन.
- २०१३ : अल्पवयीन मुलीला बंदिवान करुन तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी आसारामबापूंविरुद्ध एक हजार पानांचे आरोपपत्र दाखल.

अॅप वर्ल्ड

फोटोशॉप मोबाईलवर

मुलांनो, 'फोटोशॉप' या सॉफ्टवेअरमुळे फोटोंना वेगवेगळे इफेक्ट्स देता येतात. अगदी साधासा वाटणारा फोटोही फोटोशॉपमुळे वेगळा दिसू लागतो. पण मोबाईलमध्ये काढलेल्या फोटोंचं काय? म्हणूनच 'अॅडोब'ने फोटोशॉपचं मोबाईल अॅप तयार केलं आहे. हे अॅप डाउनलोड केल्यानंतर मोबाईलमधल्या फोटोंना भन्नाट इफेक्ट्स देता येतील.

या अॅपमध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. फोटोशॉपच्या अॅपमुळे युजर्स नैसर्गिक आणि क्रिएटिव्ह असे दोन्ही प्रकारचे फोटो काढू शकतील. शिवाय एडिट आणि शेअर करण्याची सोयही यात असेल. या अॅपमध्ये 'अॅडॉब सेन्सी' बसवण्यात आलं आहे. यामुळे अॅपला फोटोत नेमकं काय आहे हे अगदी पटकन लक्षात येईल. हे अॅप युजरला वेगवेगळ्या सूचनाही देईल. फोटो काढल्यानंतर मूळ फोटो सेव्ह होतो आणि त्याच फोटोच्या प्रतीला निरनिराळे इफेक्ट्स दिले जातात. या अॅपच्या माध्यमातून अॅडॉबला फोटोशॉप सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायचं आहे.

आरोग्यमंत्र

फणसाचे औषधी गुणधर्म

आपल्याकडे विविध फळांचे आरोग्यविषयक गुणधर्म बऱ्यापैकी माहीत होत आहेत. मात्र, फणसाचे आरोग्यदायी गुणधर्म जाणून घेणंही तितकंच महत्त्वाचं ठरणार आहे. काटेरी शरीराचा भार सोसत पोटात रसाळ गरे ठेवणारा फणस आरोग्यास अत्यंत गुणकारी आहे. फणसाच्या बिया, दूधही उपयोगात आणलं जातं.



* लोहाचा उत्तम स्त्रोत म्हणून फणसाकडे पहिलं जातं. शरीरातील लोहाची कमतरता फणस खाल्ल्यामुळे भरून निघते, त्यामुळे फणस हा रक्तक्षयामध्ये महत्वाची भूमिका बजावतो.
* फणसामध्ये पोटॅशियम भरपूर प्रमाणात असल्याने हृदयरोगावर हे अत्यंत उपयुक्त फळ आहे. फणसाच्या सेवनाने रक्ताभिसरण प्रक्रिया सुधारते आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो. कच्चा फणस पाण्यात उकळून त्याचं पाणी प्यायल्यास दम्याचा त्रास कमी होण्यास मदत मिळते.
* फणसामध्ये मोठ्या प्रमाणावर खनिजं असल्याने संप्रेरकातून होणाऱ्या अतिरिक्त स्त्रावांवर नियंत्रण राहतं. फणसामधील मॅग्नेशियमच्या पर्याप्त मात्रेमुळे हाडं मजबूत रहायला मदत होते.
* फणसामध्ये क जीवनसत्व मोठ्या प्रमाणावर असल्याने रोगप्रतिकारकक्षमता वाढवण्यास मदत होते.
* फणसामधील तंतूमय घटकांमुळे पचन आणि उत्सर्जन प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होते. रक्ताशी संबंधित विकारांवर फणस औषध म्हणून वापरला जातो.

पंचांग

शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अश्विन कृ. १२ **(धनत्रयोदशी)**,
चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : हस्त, योग : विष्कंभ,
सूर्योदय ६.४३, सूर्यास्त ६.०१

फॉरवर्ड्स

हज़ार शिकारियों क़े बीच में बेख़ौफ़ परिन्दा हूँ...

न जानें किसकी दुआ साथ हैं ज़ो मैं जिन्दा हूं...!

भटकंती

पावसाळा संपल्यावर अनेक जण ट्रेकिंगची योजना आखतात. ट्रेकिंगसाठी विविध ठिकाणं आहेत. यापैकीच एक ठिकाण म्हणजे प्रबळगड. हा किल्ला माथेरानपासून ४६ किलोमीटर अंतरावर आहे. माथेरान आणि पनवेलच्या मध्यभागी हा किल्ला वसला आहे. पश्चिम घाटात वसलेला हा किल्ला खूप सुंदर आहे. माथेरानपासून जवळ असणाऱ्या एका पठारावर हा किल्ला बांधण्यात आला. कल्याण आणि पनवेल परिसरावर लक्ष ठेवण्याच्या उद्देशाने हा किल्ला बांधण्यात आला होता. मुघलांच्या ताब्यातला हा किल्ला शिवाजी महाराजांनी स्वराज्यात आणला. **(क्रमश:)**

करिअरवाटा

स्टेम सेल रिसर्चची नवी वाट

सध्याच्या आधुनिक युगात वैद्यकीय क्षेत्रात बरंच संशोधन होत आहे. त्यातून अनेक दुर्धर व्याधी बऱ्या करण्यासाठी स्टेम सेल उपचारपद्धती लाभदायक ठरत असल्याचं दिसून येत आहे. साहजिक येत्या काळात या क्षेत्राचा विस्तार होणार असून इच्छुकांना या क्षेत्रामध्ये उत्तम काम करता येण्यासारखं आहे. केवळ मेडिकल क्षेत्राशी संबंधित उमेदवार या क्षेत्रामध्ये कारकिर्द घडवू शकतात असा गैरसमज आहे. वस्तूत: सामान्य जीवशास्त्र शाखेतील विद्यार्थीही या शाखेत काम करू शकतात. काही वेगळं करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी हे योग्य क्षेत्र आहे. बायोलॉजिकल सायन्समधला बीएसएसी ग्रॅज्युएट, एमबीबीएस, बीफार्म, बीई बायोटेक्नॉलॉजी पदवीधारक स्टेम सेल रिसर्चमध्ये काम करू शकतो. भारतात अनेक संस्था या थेरपीवर संशोधन करत आहेत. प्रामुख्यानं फॉर्मास्युटीकल आणि बायोटेक्नॉलॉजीमधील कंपन्या तसेच प्रमुख स्टेम सेल्स संस्था या थेरपीवर संशोधन करत आहेत. यामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणारे उमेदवार दरमहा उत्तम आर्थिक प्राप्ती करू शकतात. पीएच.डीनंतर या उत्पन्नात वरचेवर वाढ होत राहते. या संदर्भातील प्रशिक्षण देणाऱ्या संस्था बंगळुरू, पुणे, मुंबई, हैद्राबाद आदी ठिकाणी कार्यरत आहेत. या क्षेत्रातील उत्तम कारकिर्दीच्या संधीचा अवश्य विचार करावा.



खेचाखेची

टॅलेंट आणि काम

बॉस : तू इतका टॅलेंटेड आहेस, मग माझ्या टीममध्ये काम का करत नाहीस?

मी : सर, मी तुमच्याच टीममध्ये आहे !

बॉस : ते मलाही माहिती आहे. पण मी विचारतोय...

.
.
.

काम का करत नाहीस ?

वेगळं काही

चीनला आपले पंख पसरवण्यासाठी पृथ्वीही कमी पडू लागली आहे. म्हणूनच हा देश अंतराळात आर्थिक झोन तयार करण्याच्या प्रयत्नात आहे! चंद्र आणि पृथ्वी यांच्या दरम्यान हा आर्थिक झोन असेल. २०५० पर्यंत अंतराळात आर्थिक झोन विकसित करण्याचा चीनचा प्रयत्न आहे. चीनच्या 'एअरोस्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन'ने हा प्रकल्प राबवण्याचं ठरवलं आहे. प्रकल्पावर १० ट्रिलियन डॉलर खर्च करणार आहे. त्यासाठीचं प्राथमिक तंत्रज्ञान २०३० पर्यंत विकसित करण्यात येईल तर प्रमुख तंत्रज्ञान विकसित होण्यासाठी २०४० हे वर्ष उजाडेल. २०५० पर्यंत चीन अंतराळात इकॉनॉमिक झोनची स्थापना करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

रूचिरा

आलू सोयाबीन कोफ्ता करी

एकाच पद्धतीच्या भाज्यांऐवजी सोयाबीन आलू कोफ्ता करी करुन पहा.



साहित्य : अर्धा कप सोया चंक्स, दोन उकडलेले बटाटे, चार टोमॅटो, एक इंच आलं, एक हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबीर, तीन चमचा बेसन, अर्धा चमचा जीरं, एक चमचा कसूरी मेथी, पाव चमचा हळद, चमचाभर लाल तिखट, दीड चमचा धनेपूड, पाव चमचा गरम मसाला, मीठ, तेल, तमालपत्र, दालचिनी, ३ लवंग, ६-७ काळी मिरी, एक मोठी वेलची.

कृती : सोयाबीन क्रंचेस कुटून अर्धा कप गरम पाणी घालून भांडं झाका. दहा मिनिटांनी कुस्करलेले बटाटे, मीठ, धनेपूड, लाल तिखट, हिरवी मिरची, हळद, दोन कोथिंबीर, बेसन घाला. मिश्रण एकजीव करा. कढईत तेल गरम करून मिश्रणाचे गोळे तळा. करीसाठी आलं, टोमॅटो, हिरवी मिरची मिक्सरमध्ये वाटून घ्या. कढईत तेल गरम करून जीरं, खडे गरम मसाले घाला. हळद, धनेपूड परतून टोमॅटो, आलं-मिरची पेस्ट, कसुरी मेथी घाला. कढईतल्या मसाल्यात बेसन, दीड कप पाणी, गरम मसाला पावडर, कोथिंबीर घाला. ग्रेवी उकळू द्या. नंतर थोडं क्रीम, चवीनुसार मीठ घाला. झाकण ठेवून धीम्या आचेवर ग्रेवी शिजवा. शेवटी कोफ्ते ग्रेवीमध्ये मिसळा. गरम खायला द्या.

सुडोकू १७०

५	३	८						
७		२		५	३			१
				९		८	३	५
					७	१		२
६								४
४		५	६					
३	६	७		८				
२			३	१		७		६
						५	२	३

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १६९ चे उत्तर

३	८	२	४	१	७	६	९	५
५	९	७	८	३	६	२	४	१
६	१	४	२	९	५	८	३	७
१	६	९	३	५	४	७	२	८
२	३	५	६	७	८	४	१	९
७	४	८	९	२	१	५	६	३
४	२	३	५	८	९	१	७	६
९	५	१	७	६	२	३	८	४
८	७	६	१	४	३	९	५	२

शब्दकोडे क्रमांक १७०



आडवे शब्द:-

१) जयप्रकाश नारायण यांना लोकांनी दिलेली पदवी
५) एकादे काम करण्यासाठी समर्थ असलेला
७) पक्षांना फाशात पकडून शिकार करणारा
११) कापडाचा एक हलका प्रकार
१२) थापा मारणारा
१४) चाकर
१६) मान, प्रतिष्ठा
१७) बारीक खडा
१८) विहीरीतून पाणी काढण्याचे एक विशिष्ठ प्रकारचे भांडे
१९) बागेतील वृक्षांची निगा राखणारा
२०) पाणकोंबडा
२३) रम्य
२५) मनाचा ओढा
२६) सन्मानाची अल्प रक्कम
२७) घाई, त्वरा
२८) सावधगिरी
२९) मत्स्य
३१) दुष्ट, भांडखोर
३३) हिंदीत क्षण
३४) ढोंग उघडकीस येणे
३८) गाढव
३९) एक तारवाद्य
४०) हाक, प्रतिसाद
४१) सेवक
४२) गणितातील अधिक
४४) धनुष्यबाण
४७) सवाद्य मिरवणूक
५१) जुनीच्या विरुद्ध
५२) वस्त्राचा शेवटचा भाग
५३) फुरसत
५४) वरपांगी
५५) अंत:करण
५६) गुणांची कदर करणारा
५८) देणारा
५९) यात्रेस जाणे
६०) पोलिस
६२) कसदार
६४) *** माकत
६५) हिंदीत ढग
६६) जनक राजाची मुलगी, सीता
६७) तिबेटी धर्मगुरु
६८) हाकेला दिलेले उत्तर

उभे शब्द :-

१) लोखंडाला चिकटणारा
२) हस्त
३)श्वासोच्छ्वासाचा अवयव
४)गोष्टी सांगणे
५) सुताराकडचे एक हत्यार
६) रम्य
७) पुष्कळ
८) फुलाचा एक भाग
९) दात
१०) धैर्य
१३) चबुतरा, कट्टा
१५) युक्ती
१९) आई ** मरो मावशी जगो
२१) चिखलाची भुसभुशीत जमीन
२२) गप्प बसण्याचे व्रत
२४) हद्दपार एक शिक्षा
२६) आई-वडील
२७) एक तंतूमय वनस्पती
२९) एक मराठी महिना
३०) शनीचा त्रासदायक फेरा
३१) काठ बाजू
३२) गमन करणे
३३) परत करणे, परतफेड
३५) निष्णांत, वाकबगार
३६) छाती, वक्ष
३७) दुसऱ्याकरिता केलेला खर्च
३८) वाळा-एक अत्तर
३९) सपाट
४१) दानी, दानशूर
४३) पद्धतीनुसार.
४५) माणूसकी
४६) पळसाचा डिंक
४८) उगवत्या सूर्याचा देश
४९) गावातील सहवासी
५०) उसनवार
५५) मोठा राजा
५७) उष्णता, जळजळीतपणा
५८) दरवाजा
५९) वाद्य वाजविणारा
६१) पती, यजमान
६२) अनर्थ, धक्का
६३) हिंदीत उद्या
६५) लहान मुलगी

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

ए	का	त	ळ्या	त	हो	ती	ब	द	के	पि	ले	सु	रे	ख
क	ट	र		रु		ज	र		व	सा		धा		टा
	क		म	व	णी		क	र	डा		म	क	ब	रा
अ	स	ह	का	र		पा	त	क		स	म	र	स	
सा	र	वा	न		श	व		म	म	ता			क	प्पा
धा		ल		वा		क	र	पा		र	वि	वा	र	
र	स	दा	र		का		ख	त	रा		ना	चा		अं
ण		र	ख	वा	ल	दा	र		मा	सा		वी	क्षि	त
	गो		र	स		रा	खी	व		व	खा	र		र
दु		स	खा		पां		त	र	बे	ज			पा	पा
आ	ट	पा	ट	न	ग	र		क			क	ट	क	ट
ब		टू		फा		म	ग	र	मि	ठी		म	ळी	
	ज	न	न		रा	जा	रा	णी			ख	ट		जी
दा	ह		ग	जा	न	न			रा	म	रा	म		व
स	र	का	र		टी		स	र्व	त्र		टा		पा	न

बॅडमिंटनमध्ये रायगड संघाला दुहेरी विजेतेपद

सब-ज्युनियर सांघिक बॅडमिंटनमध्ये मुला-मुलींच्या दोन्ही गटांत बाजी

। पुणे । प्रतिनिधी ।

सुधांशु बॅडमिंटन अकादमीच्या वतीने आणि समर्थ ग्रुपच्या सहकार्याने आयोजित योनेक्स सनराईज एसबीए कप राज्यस्तरीय सब-ज्युनियर आंतरजिल्हा सांघिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत रायगड संघाने मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही गटांत विजेतेपद पटकावून दुहेरी कामगिरी नोंदवली.

शिवाजीनगर येथील पी. ई. सोसायटी मॉडर्न पीडीएमबीए स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या बॅडमिंटन कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात रायगडने बुलढाणा संघाचा २-१ असा पराभव केला. रायगडच्या कृत्य पटेलने एकेरीच्या



सामन्यात बुलढाण्याच्या देवव्रत खांडेकरचा सहज पराभव करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर दुहेरीच्या सामन्यात बुलढाण्याच्या देवव्रत खांडेकर आणि करण सावळे यांनी रायगडच्या कृत्य पटेल व मयुरेश भुटकी यांचा पराभव करत सामना बरोबरीत आणला.

कृत्य पटेल-मयुरेश भुटकी जोडीचा धडाका

निर्णायक एकेरीच्या सामन्यात रायगडच्या प्रगणय शिंदेने करण सावळेचा पराभव करत रायगडच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.रायगडने उपांत्य फेरीत नागपूरचा २-० असा पराभव केला होता. या सामन्यात कृत्य पटेलने आदित्य यौलचा पराभव केला, तर दुहेरीत कृत्य पटेल-मयुरेश भुटकी या जोडीने आदित्य यौल-साईराज नायसे जोडीवर मात केली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात बुलढाण्याने ठाण्याचा २-० असा पराभव केला. देवव्रत खांडेकरने विश्वजीत थविलचा १५-१२, १६-१८, १५-१२ असा पराभव केला, तर देवव्रत खांडेकर-करण सावळे जोडीने मयंक राजपूत-विश्वजीत थविल जोडीवर १५-८, १५-९ अशी मात केली.

१७ वर्षांखालील मुलींच्या अंतिम फेरीत रायगडने पुणे संघाचा २-१ असा पराभव करत विजेतेपदाला गवसणी घातली. रायगडच्या अनुष्का इप्टे आणि प्रांजल शिंदे यांनी निर्णायक कामगिरी बजावत संघाला जेतेपद मिळवून दिले.पहिल्या एकेरीच्या सामन्यात अनुष्का इप्टेने पुण्याच्या कायरा रैनाचा ८-१५, १७-१५, १५-१० असा पराभव करत रायगडला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर दुहेरीत पुण्याच्या शरयू रांजणे आणि सोयरा शेलार यांनी अनुष्का इप्टे-प्रांजल शिंदे जोडीचा १५-१३, १५-७ असा पराभव करत सामना बरोबरीत आणला.

निर्णायक एकेरीच्या सामन्यात प्रांजल शिंदेने समन्वया धनंजयचा १५-११, १५-१३ असा पराभव करत रायगडच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.उपांत्य फेरीत रायगडने मुंबई उपनगरचा २-० असा पराभव केला. अनुष्का इप्टेने स्पृहा जोशीचा १५-१२, १५-१० असा पराभव केला. त्यानंतर अनुष्का इप्टे-प्रांजल शिंदे जोडीने अनिका तनेजा-गार्गी दाभोलकर जोडीवर १५-५, १५-७ अशी मात केली.

स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक व २५ हजार रुपये, तर उपविजेत्या संघाला करंडक व १५ हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरण समर्थ ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी पार्थ सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी रायगड बॅडमिंटन संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र भगत, एमबीएच्या कार्यकारी समितीचे सदस्य विश्वास देशवंडीकर, पीडीएमबीएचे स्पर्धा सचिव राजीव बाग आणि स्पर्धा सचिव सुधांशु मेडसीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

निवडक



संघर्ष मंडळाचे साखळीत सलग दोन विजय

ठाणे : संघर्ष मंडळाने साखळीत सलग दोन विजय मिळवीत ठाणे जिल्हा कबड्डी असो. च्या किशोरी गट निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला. ठाणे जिल्ह्याने रा. फ. नाईक स्पोर्टस् व ग्रीफिन्स जिम. यांच्या संयुक्त सहकार्याने कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक शाळेच्या पटांगणावर या स्पर्धे चे आयोजन केले आहे. आज दुसऱ्या दिवशी झालेल्या ह गटात कोनगावच्या संघर्ष संघाने प्रथम ओम् साई मंडळावर १९-१७ अशी, तर दुसऱ्या सामन्यात पहिल्या डावातील पिछाडीवरून ओम् रुद्र संघावर मात करीत ही किमया साधली. या दोन्ही सामन्यात आदिती माळी, न्यासी तिवारी,निधी केणी, हेमल महाले यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. ओम् साई कडून रिद्धी चव्हाण, तर ओम् रुद्र कडून आर्या बोरसे यांनी चमकदार खेळ केला. ज्ञानविकासने ब गटात राम तनु संघाला ३३-२१ असे नमवीत साखळीत पहिला विजय नोंदविला. विश्रांतीला १३-०८ अशी विजयी संघाकडे आघाडी होती. वैभवी सिंग हिने ज्ञानविकास कडून, तर स्फूर्ती प्रजापती हिने राम तनु कडून शानदार खेळ केला. जयभारत स्पोर्टस् ने क गटातील चुरशीच्या लढतीत शिवसाई मंडळाला ४३-४२ असे चकवीत बाद फेरी गाठण्याच्या आपल्या आशा कायम ठेवल्या. विश्रांतीला जय भारत १९-१७ अशा २ गुणांनी पिछडीवर होत्र. विश्रांती नंतर राजनंदिनी राठोड, संस्कृती चव्हाण यांनी आपला खेळ उंचावत संघाचा विजय साकारला.



मायशाची विजयी चाल

मुंबई : एसबीआय लाइफ महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत अग्रमानांकित बुद्धिबळपटूंनी पहिल्याच फेरीत आपले वर्चस्व सिद्ध केले. राष्ट्रकुल बुद्धिबळ स्पर्धेत दोन सुवर्ण आणि एका रौप्यपदकाची कमाई करणाऱ्या मायशा परवेझने विजयी सलामी देत स्पर्धेत दमदार सुरुवात केली. त्यामुळे यंदाच्या स्पर्धेत तिच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दहिसर पश्चिम येथील रुस्तमजी केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलमध्ये या स्पर्धेला सुरुवात झाली. सात, ११ आणि १५ वर्षांखालील मुला-मुलींच्या अशा सहा गटांत एकूण ४१७ बुद्धिबळपटू सहभागी झाले आहेत. इंडियन चेस स्कूल आयोजित ही सात फेऱ्यांची स्पर्धा ६ नोव्हेंबरपर्यंत रंगणार आहे. १५ वर्षांखालील मुलींच्या गटात अव्वल मानांकित एएफएम मायशा परवेझ (१९९१) हिने अनन्या जयदीप धमालवर सहज मात केली. सी. पी. गोएंका इंटरनॅशनल स्कूलचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मायशाने विजयासह स्पर्धेतील आपले आव्हान मजबूत केले. याच गटात प्रणिता भावा आणि खानक पहारिया यांनीही विजय नोंदवले. १५ वर्षांखालील मुलांच्या गटात समविद पासबोला, विहान अग्रवाल आणि रायन मर्चंट यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजयी सुरुवात केली. ११ वर्षांखालील मुलांच्या गटात यजमान शाळेचा अव्वल मानांकित लक्ष दिघे, तर मुलींच्या गटात त्वेषा जैन यांच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. सात वर्षांखालील गटात इवान दुबे आणि लिया कृष्णन यांना अग्रमानांकन मिळाले आहे. काही अनपेक्षित निकाल आणि बरोबरीचे डाव वगळता पहिल्या फेरीत मानांकित खेळाडूंचाच दबदबा राहिला. आंतरराष्ट्रीय पंच पी. बी. भिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा सुरू आहे. दुसऱ्या फेरीत आघाडीच्या बुद्धिबळपटूंची खरी कसोटी लागणार आहे.



टाटा मुंबई मॅरेथॉनचा डंका!

मुंबई : मुंबईच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रोकॅम इंटरनॅशनलतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या टाटा मुंबई मॅरेथॉनने जागतिक स्तरावर मोहोर उमटवली आहे. ब्रँड फायनान्सच्या मॅरेथॉन्स टॉप ५०या अहवालात जगातील अव्वल ५० मॅरेथॉन ब्रँड्समध्ये २१ वे स्थान पटकावण्याचा मान या स्पर्धे ने मिळवला आहे. विशेष म्हणजे, स्ट्रॉंगेस्ट इकॉनॉमिक इम्पॅक्ट इमर्जिंग मार्केट्स या प्रतिष्ठेच्या पुरस्कारानेही टाटा मुंबई मॅरेथॉनला गौरविण्यात आले आहे. जगातील अग्रगण्य ब्रँड व्हॅल्युएशन कन्सल्टन्सी असलेल्या ब्रँड फायनान्सने मॅरेथॉन स्पर्धांची ब्रँड ताकद, लोकप्रियता तसेच त्यांचे आर्थिक आणि सामाजिक योगदान यांचा अभ्यास करून हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, जगातील आघाडीच्या ५० मॅरेथॉन स्पर्धांमुळे २०२५ मध्ये त्यांच्या यजमान शहरांमध्ये सुमारे सहा अब्ज अमेरिकी डॉलरचा आर्थिक प्रभाव निर्माण झाला. विवेक सिंग म्हणाले की, मॅरेथॉन आता केवळ धावण्याच्या स्पर्धा राहिलेल्या नाहीत, तर त्या सामूहिक सहभाग, शहराचा अभिमान आणि आर्थिक विकासाचे प्रभावी माध्यम बनल्या आहेत. टाटा मुंबई मॅरेथॉनने स्थानिक पातळीवर विकसित झालेली क्रीडा स्पर्धा जागतिक स्तरावर कशी पोहोचू शकते, हे दाखवून दिले आहे. या पुरस्कारामुळे भारतातील धावण्याच्या चळवळीला आणखी बळ मिळेल. टाटा सन्सचे कॉर्पोरेट ब्रँड आणि मार्केटिंग प्रमुख आद्रिऑन टेरॉन यांनीही या यशाचे स्वागत केले. टाटा मुंबई मॅरेथॉन ही मुंबईची जिद्द, गतिमानता आणि सर्वसमावेशकतेचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

पराभव झाला तरी ओमानची लॉटरी!

विश्वचषकाच्या क्वालिफायरमध्ये थेट एन्ट्री; यजमान नामिबियाचं टेन्शन वाढलं

। दुबई । वृत्तसंस्था ।

आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक लीग २ मधील अंतिम सामना ओमान आणि युएई यांच्यात खेळला गेला. ओमानने हा सामना ४२ धावांनी गमावला. तरीही, ओमानने २०२७ एकदिवसीय विश्वचषक पात्रता फेरीत आपले स्थान निश्चित केले. चांगल्या नेट रन रेटच्या आधारावर ओमानने नामिबियाला मागे टाकत १०-संघांच्या जागतिक पात्रता फेरीत थेट प्रवेश मिळवला

आयसीसीने हे आधीच जाहीर केले आहे की, पुढील वर्षीचा विश्वचषक ऑक्टोबर ते नोव्हेंबर दरम्यान खेळवला जाईल.



दरम्यान, ओमान या आणखी एका संघाने पात्रता फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. परंतु, हा संघ विश्वचषकाचे सामने खेळू शकेल की नाही, हे अद्याप निश्चित नाही. परंतु, दुसरीकडे यजमान देश नामिबियाला पात्र मिळवण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागला आहे. परंतु ते शर्यतीतून पूर्णपणे बाहेर पडलेले नाहीत.

ओमानने आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२७ पात्रता फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. लीग २ च्या गुणतालिकेत चौथे स्थान मिळवून संघाने आपला प्रवेश निश्चित केला आहे. विशेष म्हणजे, नामिबिया आणि ओमान गुणांमध्ये ३३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर बरोबरीत आहेत, परंतु नेट रन रेटमधील किंचित आघाडीमुळे ओमानला नामिबियाला मागे टाकत पुढील फेरीत प्रवेश करता आला आहे.

लीग २ मध्ये, पात्रता फेरीत अमेरिकेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. स्कॉटलंड आणि नेदरलँड्सनेही आपले स्थान निश्चित केले आहे. ओमानने चौथा संघ म्हणून आपले स्थान आधीच निश्चित केले आहे. पुढील वर्षीचा विश्वचषक दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियामध्ये आयोजित होणार आहे.

सूर्यकुमारच्या गळ्यात पुन्हा कर्णधारपदाची माळ

। मुंबई । प्रतिनिधी ।

टी-२० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देणारा कर्णधार सूर्यकुमार यादवला भारतीय संघातून वगळण्यात आले आहे, पण त्याच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. त्याला भारतीय संघात आपले स्थान निश्चित करण्यासाठी एक मोठे व्यासपीठ मिळणार आहे. मुंबईने रणजी ट्रॉफीसाठी त्याचा विचार केला नाही, पण तो व्हाईट-बॉल स्पर्धांमध्ये मुंबई संघाचे नेतृत्व करणार आहे.

टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, सूर्यकुमार यादव सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबई संघाचे नेतृत्व करेल. मुंबई संघाची या हंगामातील टी-२० स्पर्धा १४ नोव्हेंबर रोजी सुरू होणार आहे. ड्रडफ गटातील मुंबईचा पहिला सामना कोलकाता येथे हैदराबादविरुद्ध आहे, तर त्यांच्या गटात छत्तीसगड, गोवा, गुजरात, ओडिशा, उत्तराखंड आणि विदर्भ यांचा समावेश आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या एका सूत्राने सांगितले, वरिष्ठ निवड समितीने या हंगामातील दोन्ही व्हाईट-बॉल स्पर्धांसाठी सूर्यकुमार यादवला कर्णधार म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. संघ निवडीपूर्वी, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी ७ आणि ९ नोव्हेंबर रोजी सराव सामने खेळले जातील. मुंबई संघाची निवड ९ नोव्हेंबर रोजी केली जाईल आणि खेळाडू ११ नोव्हेंबर रोजी कोलकातासाठी रवाना होतील.

राष्ट्रीय भालाफेक स्पर्धा

महाडच्या उसामा पल्लवकरला 'सुवर्ण'

। महाड । प्रतिनिधी ।

जिद्द, चिकाटी, सातत्यपूर्ण सराव आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, याचा प्रत्यय हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या कॉलेज ऑफ सायन्स, महाड येथील विद्यार्थी उसामा पल्लवकर याने आपल्या उल्लेखनीय कामगिरीतून दिला आहे. हरियाणा राज्यातील रोहतक येथे पार पडलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत त्याने भालाफेक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत महाडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

हरियाणातील रोहतक येथील डॉ. मंगल सेन मल्टिपर्पज हॉल, महर्षी दयानंद विद्यापीठ येथे २४ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत २३व्या स्टुडंट्स ऑलिम्पिक नॅशनल गेम्स २०२६-२७ (अंडर-१९) या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातील युवा खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये उसामा पल्लवकर याने भालाफेक प्रकारात ५५ मीटरपेक्षा अधिक अंतरावर भालाफेक करून प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला.



राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत उसामाने आपल्या शारीरिक क्षमतेचे, आत्मविश्वासाचे आणि सातत्यपूर्ण सरावाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. त्याच्या या यशामुळे हिरवळ महाविद्यालयासह महाड तालुका आणि रायगड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढला आहे.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोरभाई धारिया यांनी उसामाचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा क्षेत्रातील विकासासाठी संस्थेच्या वतीने प्रोत्साहन दिले जात असल्याचे सांगितले. संस्थेच्या संचालिका सोनाली धारिया यांनीही त्याच्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांचे कौतुक केले.

अभिषेक शर्मा आयसीसी रँकिंगमध्ये पहिल्या स्थानी

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारतीय टी २० संघ सध्या चांगल्या फॉर्ममध्ये खेळत आहे. त्यातच भारतीय संघाचा डावखुरा फलंदाज अभिषेक शर्मा हा आक्रमक खेळ करताना दिसून येत आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या टी २० सिरीजमध्ये त्याने चांगली खेळी केल्याचे दिसून आले. त्याच्या या कामगिरीचे फळ त्याला मिळाले आहे. टी २० क्रिकेटच्या फॉर्मटमध्ये अभिषेक शर्मा पहिल्या नंबरचा फलंदाज बनला आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने नुकत्याच जाहीर केलेल्या २० फलंदाजांच्या ताज्या आकडेवारी आणि रँकिंगमध्ये भारतीय क्रिकेटपटूंचा दबदबा पाहायला मिळाला आहे.

अभिषेक शर्माने आपले निर्विवाद वर्चस्व राखत जगातील नंबर १ फलंदाज म्हणून आपले स्थान कायम ठेवले आहे. आपल्या आक्रमक फलंदाजीच्या बळावर अभिषेक शर्माने २० रँकिंगमधील आपले पहिले स्थान टिकवून ठेवले आहे.

दक्षिण कोरियाचा ८-१ ने उपांत्य फेरीत पराभव

। मोहाली । वृत्तसंस्था ।

गतविजेत्या भारताने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. बुधवारी मोहाली येथे खेळल्या गेलेल्या उपांत्य सामन्यात संघाने दक्षिण कोरियाचा ८-१ असा पराभव केला.

भारताकडून शिलानंद लाकडा आणि दिलप्रीत सिंह यांनी प्रत्येकी २ गोल केले. कर्णधार हरमनप्रीत सिंह, सुखजीत सिंह, अंगद बीर सिंह आणि विवेक सागर प्रसाद यांनी प्रत्येकी एक गोल केला.



भारत आता ६ नोव्हेंबरला अंतिम सामन्यात जपानशी खेळणार आहे. जपानने पहिल्या उपांत्य सामन्यात मलेशियाचा पेनल्टी शूटआउटमध्ये पराभव करून अंतिम सामन्यात स्थान मिळवले. कांस्यपदकासाठी कोरिया आणि मलेशिया आमनेसामने येतील.

सामन्याच्या चौथ्या मिनिटाला दिलप्रीत सिंहने डाव्या बाजूने शानदार मूव्ह केला. त्याने चेंडू शिलानंद लाकडाकडे दिला, ज्याने गोल करत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. कोरियाने नवव्या मिनिटाला हान सांगजुनच्या गोलमुळे बरोबरी साधली. भारताने लगेच प्रत्युत्तर दिले. पुढच्याच मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला. हरमनप्रीतने या संधीवर वेगवान ड्रॅग-फ्लिक मारली. भारत २-१ ने आघाडीवर गेला.१३व्या मिनिटाला हरमनप्रीतच्या आणखी एका ड्रॅग-फ्लिकचा कोरियन गोलरक्षकाने बचाव केला. चेंडू गोलसमोरच राहिला आणि शिलानंदने रिबाउंडवर गोल केला. पहिला क्वार्टर संपेपर्यंत भारत ३-१ ने आघाडीवर होता.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने चार गोल करत कोरियाच्या पुनरागमनाच्या आशा जवळपास संपुष्टात आणल्या. १९व्या मिनिटाला संजयच्या पासवर सुखजीत सिंहने शॉट लगावला. अशा प्रकारे भारताने स्कोअर ४-१ केला.

एमआरएफ नॅशनल रेसिंग चॅलेंज **मद्रास सर्किटवर चिरांत विश्वनाथचे वर्चस्व**

पुण्याच्या सार्थक चव्हाणला उपविजेतेपद

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

मद्रास इंटरनॅशनल सर्किटवर पार पडलेल्या प्रतिष्ठित एमआरएफ इंडियन नॅशनल रेसिंग चॅलेंजफ २ डब्लू स्पर्धेत पुण्याच्या १९ वर्षीय सार्थक चव्हाण याने चमकदार कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. पेट्रोनास टीव्हीएस रेसिंग संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सार्थकला या स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

चेन्नई येथे पार पडलेल्या या तिसऱ्या फेरीमध्ये सर्वाधिक



थरारक ठरलेल्या सुपर स्पोर्ट ३०१-४०० सीसी ओपन गटात बंगळुरूच्या चिरांत विश्वनाथने बाजी मारली. त्याने आपला कट्टर प्रतिस्पर्धी आणि पेट्रोनास टीव्हीएस रेसिंगमधीलच संघसहकारी सार्थक याला मागे टाकत सलग दुसऱ्या दिवशी अव्वल स्थान मिळवून दुहेरी विजय नोंदवला. सार्थकने या फेरीतील दोन्ही शर्यतींमध्ये दुसरा क्रमांक मिळवला.

सकाळपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे ही शर्यत निर्धारित वेळेपेक्षा अर्धा तास उशिरा सुरू करण्यात आली. केवळ ६ लॅप्सच्या या छोट्या अंतराच्या शर्यतीत देशातील अव्वल रायडर्समध्ये प्रत्येक सेकंदासाठी तीव्र चुरस पाहायला मिळाली. शनिवारी झालेल्या पहिल्या शर्यतीत चिरांतने विक्रमी लॅप वेळेसह प्रथम क्रमांक पटकावला, तर सार्थकने दुसरा क्रमांक पटकावला. याच शर्यतीत मोहम्मद मिकैल याने तिसरा आणि रक्षित दवे याने चौथा क्रमांक मिळवला.

दुसऱ्या दिवशीच्या शर्यतीतही सार्थक आणि चिरांत यांच्यात सुरुवातीपासूनच अटीतटीचा संघर्ष रंगला होता. शर्यतीच्या अत्यंत निर्णायक आणि शेवटच्या टप्प्यात चिरांतने सार्थकला चकवत अनपेक्षित आघाडी घेतली.

या तीव्र वळणावर सार्थकचे गाडीवरील नियंत्रण काही क्षणांसाठी विचलित झाले आणि त्याची हीच चूक त्याला आघाडी गमावण्यास कारणीभूत ठरली. अखेर चिरांतने बाजी मारत या विकेंडमधील आपला सलग दुसरा विजय साकारला, तर सार्थकला पुन्हा एकदा उपविजेतेपदावरच समाधान मानावे लागले.

यापूर्वी सप्टेंबर महिन्यात पार पडलेल्या स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत सार्थकने सुपर स्पोर्ट ३०१-४०० सीसी ओपन या मुख्य गटात सलग दोन विजय मिळवून दुहेरी मुकुट पटकावला होता. तसेच पेट्रोनास टीव्हीएस रेसिंग वन-मेक चॅम्पियनशीप स्पर्धेच्या इलेक्ट्रिक आरटीई या गटातही अव्वल क्रमांक पटकावून तिहेरी यश संपादन केले होते. सार्थक चव्हाण हा प्रशिक्षक अमोल तळपदे यांच्या मार्गदर्शनाखाली सरावाचे धडे गिरवत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)